# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.१.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

शनिवार **दिनांक २० जानेवारी २००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किशनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी १२.१५ वाजता ''**वंदेमातरम्**'' या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०२. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०३. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०४. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०५. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०६. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०७. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०८. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
०९. स.स.धिल्लन तरविंदरसिंग महेंद्रसिंग
१०. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
११. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१२. स.स.सौ.आशन्ना लक्ष्मी शंकर
१३. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१४. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१५. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ

२७. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद
२८. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२९. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३०. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३१. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३२. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३४. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३५. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३६. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३७. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.शे.इब्राहीम शे.इमाम
४०. स.स.सौ.राऊत छाया विलास
४१. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४२. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४३. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४४. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४५. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४६. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४७. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४८. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४९. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५०. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५१. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५२. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५३. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५५. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५७. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५८. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५९. स.स.श्री.खुडे विजय किसन
६०. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६१. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६२. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६३. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक

६४. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६५. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६६. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
६७. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६८. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६९. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७०. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७१. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७२. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७३. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७४. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७५. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७६. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७७. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७८. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७९. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८०. स.स.श्री.शिरसाट संजय पांडुरंग
८१. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८२. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८३. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८४. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

श्री.गजानन बारवाल : स.सदस्या सौ.अनिता घोडेले यांचे आई स्व.**सरस्वती नाईक** यांचे दु:खद निधन झालेले आहे त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी

श्री.अ.साजेद अ.सत्तार : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर : ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याच वेळी स्व.श्रीमती सरोजनी नाईक यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

मा. महापौर : विकासात्मक कामे होण्यासाठी यापूढे प्रत्येक बैठकीत अगोदर विषय पत्रिका घेतली जाईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मागिल बैठकीत प्रशासकीय अधिकारी यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला होता. कार्यवाही झालेली नाही. होत नसेल तर मी या सभागृहातून बाहेर निघून जात आहे.

श्री. भगवान घडमोडे : विकास कामासाठी आपणा सर्वांना सुज्ञ नागरीकाणी निवडूण दिलेले आहे. त्यामूळे विषयपत्रिकेवर अगोदर निर्णय घेण्यात यावे.

श्री.सलीम खान : सन १९८८ पासून सभागृहात अगोदर चर्चा होते व नंतर विषयपत्रिकेवर निर्णय होतात.अगोदर चर्चा घेण्यात यावी.

मा. महापौर : विरोधी पक्ष नेते यांची जी मागणी आहे त्या वर चर्चा करण्याची सम्मती देत आहे. मागच्या बैठकीत त्यांनी तो मुद्या उपस्थित केला होता.चर्चा करायची की नाही हा पिठासीन अधिकारी यांचा अधिकार असतो. एकाच विषयावर चर्चा होणार आहे इतर विषयावर नाही.

याच वेळी अनेक सदस्य मा. महापौर डायस समोर जावून मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही. तसेच स. स. श्री. सलीम खान हे अगोदर चर्चा करावी म्हणून महापौर डायस समोर खाली बसतात.

मा. महापौर : सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर जावून एक एक सदस्यांनी बोलावे.डायस समोर कुणीही येवू नये. नियमावलीनूसार अगोदर प्रश्न विचारावा लागतो नंतर त्यावर चर्चा करता येते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: जानेवारी महिना चालू आहे एकही विकास काम वार्डात झालेले नाही.

मा. महापौर : स.सदस्य यांनी आपआपल्या जागेवर बसावे. स.विरोधी पक्ष नेता यांचे प्रश्नावर चर्चा करावी स.सदस्य श्री.सलीम खॉन यांना विनंती की त्यांनी डायस समोर बसू नये. आपल्या जागेवर बसावे.

मा.महापौर यांनी वेळोवेळी सूचना करून ही स.सदस्य श्री.सलीम खान जागेवर बसत नाही मोठमोठयाने बोलतात.

मा. महापौर :स. स श्री. सलीम खान यांना वारंवार सूचना देवूनही ते आपल्या जागेवर बसत नसल्याने त्याचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य केले.त्यांनी सभागृहाबाहेर जावे.

स.स.श्री.सलीम खान यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करूनही ते सभागृहात उपस्थित असतात.

श्री.काशिनाथ कोकाटे : मागिल सभेतही चर्चा होवू दिली नाही सभा संपविण्यात आली. चर्चा करू दयायची नसेल तर आम्हाला कशासाठी बोलविले. जनतेनी त्यांची समस्या सोडविण्यासाठी आम्हाला पाठविले आहे अगोदर चर्चा करू दयावी.

मा. महापौर : विषयपत्रिका झाल्यानंतर जनरल चर्चा घेण्यात येईल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : सभागृहाच्या भावना लक्षात घेवून चर्चा अगोदर घेण्यात यावी.

श्री.तणवानी किशनचंद :जनरल चर्चेला एकाच विषयाला परवानगी न देता सर्वाचे विषय मांडू दयावे.नसता विषय पत्रिका अगोदर घ्यावी त्यानंतर चर्चा घेण्यात यावी.

याच वेळी विरोधी पक्ष नेते हे मा. महापौर यांचे डायस वरील राजदंड धरण्याचा प्रयत्न करतात.

मा. महापौर : डायस समोर कूणीही येवू नये नसता सदस्यत्व रद्द केले जाईल. विषय पत्रिकेवर बोलावे दुपारी. ४ ते ५ च्या दरम्यान चर्चा घेतली जाईल.

श्री.संतोष खेंडके : स.सदस्य मोठमोठयाने बोलून सभेचे कामकाज होवू देत नसतील तर सभा तहकूब करावी.

मा.महापौर : चेलीपूरा भागात एक अतिक्रमण चालू असल्या बाबत पत्र देवून मा. विरोधी पक्ष नेता यांनी तक्रार केलेली होती. तक्रार करूनही प्रशासकीय अधिकारी यांनी दखल घेतली नाही.त्या संदर्भात चौकशी करावी व त्यांची बदली करण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : भष्ट्राचाराला खतपाणी घालण्याचे प्रयत्न होत आहे. म्हणून चर्चा होत नाही.

मा. महापौर : १० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते (वेळ दू.१२.३५ वा पुन्हा सभेला दु.१.०० वा. सुरूवात)

श्री.संतोष खेंडके : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा विदयापीठ समोरील पुतळया संदर्भात चर्चा करण्याची स. श्री. मिलींद दाभाडे स.श्री. पुरूषोत्तम ठाकूर यांनी विनंती केली आहे त्यानूसार चर्चा व्हावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: एकदा चर्चा सूरू झाल्यानंतर सर्व विषयावर चर्चा घेण्यात यावी..

मा. महापौर : सभागृह नेता यांनी सूचना मांडल्यानूसार त्या विषयावर चर्चा करावी. तसे पत्रही स.सदस्य यांनी माझेकडे दिले. त्या बाबतीत चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते.

श्री.मिलींद दाभाडे :या देशाला ज्या महापूरूषाने राज्य घटना दिली देश भ्रष्टाचार निर्मुलन महासत्ता झाला पाहिजे असे स्वप्न ज्या महापूरूषाने पाहिले त्या महापूरूषाचा विदयापीठ गेट समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूतळयाला सहा ते सात वर्षात तीन ते चार वेळेस खिलच्या निघताना दिसून आले. ते निदर्शनास येवू नये म्हणून महापालिकेचे अधिकारी डेको पेन्ट करते.जबाबदार अधिकारी भ्रष्टाचार करतात त्याचा मी निषेध करतो.तज्ञाकडून अधिक माहिती घेतली असता ब्रॉँझच्या पूतळयाला डेको पेन्ट करणे चूकीचे आहे. या प्रकरणात जे जे संबधीत अधिकारी गुंतलेले आहे. त्यांचेवर कडक कार्यवाही झाली पाहिजे नसता सोमवार पासून उपोषणास बसणार आहे. तसेच पूतळा हा मुख्य रस्त्यावर बसविलेला आहे. एखादे वाहन त्या पूतळयास धक्का देवून जावू शकते. त्यामूळे या शहराचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल. त्यामूळे सदर पूतळा रस्त्याच्या बाजूला विदयापीठ कडून किंवा पीईएस सोसायटीकडून जागा घेवून त्या ठिकाणी बसवावा अशी विनंती आहे.ब्रॉँझ पूतळा तेथे बसवावा. तेथील पूतळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात सुरक्षित ठिकाणी ठेवून तेथे स्थापना करावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :मागिल वर्षी ही या पूतळयाच्या खिलच्या निघाल्या होत्या कूणी काहीतरी टाकले काय असा संभ्रम निर्माण होवून जनतेत रोष निर्माण झाला होता व वातावरण खराब झाले होते. त्यावेळी आम्ही सदस्य एकत्र आलो नागरीकाची समजूत काढली. महापालिका प्रशासनाचे अधिकारीही उपस्थित होते. या पुतळा उभारणीच्या कामामध्ये जे जे दोषी असेल त्या बाबतीतची चौकशी मा.भोगे साहेब यांचेकडे दयावी. चौकयी अहवाल आल्यानंतर संबधीत अधिकारी यांचेवर कडक कार्यवाही

करून या पुतळयाच्या बाजूलाच चौकात एक हायमस्ट लावण्याचीही कार्यवाही करावी. पी.ई.एस.सोसायटीला एक निवेदन देवून मागिल रस्ता करण्यासाठी जागा मिळू शकते.

श्री.विनायक पांडे :रस्त्याचे रूंदीकरण हे झाले पाहिजे. पुतळयाच्या मागिल जागा पीईएस सोसायटीकडून मिळाली तर त्या पुतळयाला भविष्यात कोणताही अनर्थ होणार नाही. बीबीका मकबरा कडे अनेक पर्यटक त्या रत्याने जात असतात. गर्दी दिसून येते. ज्यावेळेस पूतळा उभारण्यात आला त्यावेळची संचिका या मागवून नेमका पूतळा कशाचा आहे याची संपूर्ण चौकशी करून संबधीतावर कार्यवाही व्हावी.

श्री.संजय जोशी :हा गंभीर प्रश्न आहे. नुसता पूतळा बघून तो कशाचा आहे हे समजून येत नाही. पुतळा तयार करण्यासाठी जे टेंडर काढले होते कोणत्या मटेरियलसाठी काढले होते. व कोणते मटेरीयल करण्यात आले. धातूतज्ञाकडून त्याची चौकशी करावी. अहवाल दोन तीन दिवसात मागवून त्याची मूळ संचिका समोर ठेवून जर टेडर मागविल्यानूसार जर मटेरियलमध्ये तफावत येत असेल तर ज्यांनी पुतळा दिला त्यांनी करारनामा केला असेल.जो पूरवठा धारक आहे त्यांचेवर पोलीसात गुन्हा नोंद करावा. मूळ चौकशीची सुरूवात ही पूरवठा धारकाकडून होईल. करारनामा केला एक व पुरवठा वेगळा त्यावेळी अधिकारी कोण होते याची सखोल चौकशी करून कार्यवाही व्हावी.

श्री.अ.रशिद खान : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना तयार केली नसती तर मी ही व आणखी कूणीही महापौर झाले नसते. या पूतळया बाबत वारंवार बातम्या छापून येत आहे. पीइएस सोसायटीकडून जागा घेवून नवीन पूतळा बसविण्याची कार्यवाही करावी. हया पूतळया संदर्भात सखोल चौकशी करावी तेथील पूतळा हटवून बाजूला जागा घेवून दुसरा पुतळा होत असेल तर योग्यच आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :पीईएस सोसायटीकडून जागा घेवून तेथे बेट तयार करून ते चांगल्या पध्दतीने पूतळा तयार करून बसवावा. यासाठी निधी नसेल तरी मार्च नंतर सर्व सदस्यांच्या स्वेच्छानिधीतून निधी उपलब्ध करून घ्यावा व नवीन पूतळा करण्यात यावा. यामूळे विदयापीठाची शान वाढेल. जो पर्यटक येतात त्यांचेसाठी ही आकर्षक होईल यामूळे महानगरपालिकेची प्रतिमा वाढेल.

श्री.काशिनाथ कोकाटे :डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा पूतळा तेथे असावा स्मारक असावे म्हणून अनेक समाजाच्या लोकांची भावना होती. त्या भावनेचा आदर करून आपण महापौर असतांनाच तेथे स्मारक उभारण्याकरीता एक मताने मंजूरी दिलेली होती. व शासनाची एनओसी घेण्या करीता शासनाकडे पाठपूरावा करून मान्यता घेतलेली होती. पूतळा तयार करण्यासाठी व तेथे सुशोभिकरण करण्यासाठी १ कोटी रूपये अंदाजपत्रकात ठेवण्यात आले होते. पानचक्की ते विदयापीठ गेटकडे जाणारा एक मध्ये रस्ता आहे. विकास आराखड्यात तो रस्ता आहे. कुणी जागा देत नसेल तर विकास आराखडयाप्रमाणे तो रस्ता करावा. त्यामूळे तेथील पुतळयाला रहदारीचा कोणताही अडथळा होणार नाही. सन २००१ मध्ये हे सर्व घडले व आज सन २००७ आहे. पीइएस सोसायटी किंवा विदयापीठच्या कार्यकारीणीशी किंती वेळा

आजपर्यंत चर्चा केलेली आहे या बाबतीत प्रशासनाकडून खूलासा घ्यावा.विकास आराखड्यानूसार तेथील रस्त्याचे कामाचे टेंडर का काढले नाही. तसेच तेथे बेटाचे काम करण्यासाठी अस्था का दाखविलेली नाही याचा खूलासा घ्यावा.त्या पूतळयासाठी कोणते मटैरियल वापरले त्याची दुरावस्था का करण्यात आली हा भाग वेगळा आहे. गेल्या सहा वर्षात एक कोटीचे बजेट ठेवलेले होते ते का वापरले गेले नाही. याचीसखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : उद्घाटन लवकर होत नव्हते म्हणून अनेक दिवस पूतळा झाकलेला होता. शेवटी दलीत बांधवानी पुतळा काढून मा.श्री.शेगावंकर यांनी विनंती करून उद्घाटन होत नसल्याचे पाहून पुतळयाचे उद्घाटन करून टाकले.सर्व सोयीयूक्त होवून उद्घाटनाचे काम होणे आवश्यक होते. जे बेट तयार करावयाचे होते ते केले नाही. पुतळा पून्हा तयार करणार जो खर्च होणार आहे दुसऱ्यादा खर्च होतो त्यास कोण जबाबदार आहे. आजही वेळ गेलेली नाही. कमेटी नियुक्त करावे. पुतळा कुठेही शिप्ट केला तरी तेथे बाजूला बेट करण्यात यावे. बजेट असतांना रस्त्याचा विकास पाच वर्षात का झाला नाही. राजकीय दृष्टीकोनातून बोलण्याची सर्वाची तळमळ असते. कुणी राजकारण न करता काम करावे अशी विनंती आहे.

श्री.सलीम खॉन :पुतळयाच्या खिलच्या निघतात हे पहिल्यांदा माजी विरोधी पक्ष नेता श्री. अफसर खॉन यांनी ॲड. रमेश वकील यांना घेवून पाहणी केली त्याचवेळी स. सदस्य श्री. दाभाडे तसेच स.श्री.पुरूषोत्तम ठाकूर यांना बोलविण्यात आले.पुतळयाच्या खिलच्या निघतात महानगरपालिकेचे याकडे लक्ष नाही हे बरोबर नाही त्यावेळी उपआयुक्त महसूल यांनाही तेथे बोलविण्यात आले होते. त्यावेळी तात्पूरता पेन्ट मारू असे म्हटले त्यास आम्ही विरोध केला. तरी पेन्ट मारल्या गेला. हायमस्ट लावण्या बाबत मी उपआयुक्त महसूल यांना पत्र देवूनही कळविले होते.तसेच पुतळयाच्या पाठीमागे पीईएस सोसायटीची जागा आहे ती रस्त्यासाठी घेण्यात यावी या पूतळयास बेट करावे असे निदर्शनास आणून दिले. ज्या अधिकाऱ्यानी यात भ्रष्टाचार केला त्यांचेवर कडक कार्यवाही करावी त्यांना निलंबीत करावे. अशी विनंती आहे. व तेथे चांगल्या धातूचा पूतळा करावा.

श्री.प्रशांत देसरडा : पुतळा उभारणीच्या वेळेस आपण महापौर म्हणून कार्यरत होते. मी पण सभापती म्हणून कार्यरत होतो. जागे संदर्भात अनेक वेळा विदयापीठ तसेच पीईएस कॉलेज बरोबर चर्चा केली. एक दोन मूद्ये उपस्थित केले. पीईएस कॉलेजच्या जागेतून एक डीपी रोड जातो. तो रस्ता जर रद्य केला तर या पुतळयासाठी या संस्थेची जागा देवू असे त्या संस्थेचे सचिव यांनी कबूल केले होते.डीपी रोड सर्वसाधारण सभेने रद्य केला .शब्दाला आपण जागलात. परंतू सभागृहाच्या निदशर्नास आणून दिले. या भूमिमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी बरेच वर्ष काम केले. एका समाजाला दिशा देण्याचे प्रयत्न केले. तीच संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा पूतळयासाठी जागा देण्यास तयार झाली नाही. ही खेदाची बाब आहे.संबधीत सचीवानी जागा दिली असती तर हा पूतळा रस्त्यामध्ये बसवण्याची वेळ आली नसती. पून्हा पीईएस कॉलेजच्या सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून जागा घ्यावी व सूंदर असा

पूतळा उभारावा. या पूतळयाच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचे स. सदस्यांनी म्हटले ज्या अधिकाऱ्याच्या कार्यकाळात हा पूतळा बसलेला असेल. सखोल चौकशी करावी व संबधीतांवर कडक कार्यवाही व्हावी.

श्री.संजय सिरसाट : मागिल बॉडीमध्ये त्या वार्डाचे स. सदस्य श्री. तांबे होते. नामविस्तांरनाचा कार्यक्रम झाल्यानंतर एक कल्पना पूढे आली की या विदयापीठासमोरील गेट मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूतळा लावल्यास या विदयापीठातील प्रत्येक विदयार्थी नमन करून प्रवेश करेल. ही चांगली भावना होती त्यावेळी श्री. गणेश तांबे यांनी तसा प्रस्ताव ठेवला होता मी अनुमोदक होतो.पुतळा कोणताही असेल. महापूरूषाचे पुतळे बसविण्यासाठी पैशाची कमतरता तेंव्हाही नव्हती आजही नाही. त्यामूळे स्वेच्छानिधीतून देण्याची गरज नाही. तरतूद ही ५० लक्षची केलेली होती. पुतळा तर आठ लक्षमध्येच होता एवढी रक्कम ही यासाठी ठेवली होती की बाजूलाच हायमस्ट असला पाहिजे. रात्रीच्या वेळी ही तो पुतळा दिसायला पाहिजे. जेव्हा विदयापिठास नाव दिले जाते. त्या गेटवर डॉ.बाबासाहेबाच्या जीवनावरील एखादा घटनाक्रम जे की ते जेंव्हा परदेशात शिक्षणासाठी चालले होते त्या विमानाचे चित्र वगैरे करायचे होते त्यासाठी ५० लक्षची तरतूद ठेवलेली होती. आज जेथे पूतळा आहे तेथे करण्याचे प्रस्तावित नव्हते. रस्त्याच्या बाजूला तो पूतळा असावा व तेथे एक बेट सुशोभिकरण करावे म्हणून दिले होते. बाजूला डी.पी आहे. ही जागा कूणाची येथून पहिल्यांदा वाद सूरू झाला.त्यावेळी जे पदाधिकारी असतील नगरसेवक असतील त्यांनी सर्वांनी पीईएस सोसायटीला पत्र लिहिले की डॉ.बाबासाहेबांनी या कर्मभूमीमध्ये या नागसेनवन भागात मोठे कार्य केलेले आहे. त्यांचा चांगला पूतळा विदयापीठ गेट समोर तयार करावयाचा आहे जागा देण्यात यावी म्हणून मागणी केली. परंतू पीईएस सोसायटीने असे म्हटले की आमची कमेटी ही मुंबईला आहे. त्यांचेशी चर्चा करावी लागेल.त्यांचेशी चर्चा केली त्यावेळी आपण महापौर होते. परंतू या सोसायटीच्या जागेवरील डी.पी.रोड रद्द करावा म्हणून अट घातली. विदयापीठाचे नामातंर झाले. पुतळा ताबडतोब बसवायचा आहे. नसता कुणीही पूतळा बसवेल. अखेर पर्यत सदर सोसायटीने जागा दिली नाही हे खास करून नमूद करावयाचे आहे. कोणत्याही महापुरूषाचे पुतळा करण्यासाठी नगरसेवक किंवा कोणतेही पदाधिकारी असू शकत नाही. गेल्या स्थायी समितीमध्ये स. सदस्य श्री.दाभाडे यांनी दोन दिवसापूर्वी पुतळयाची पाहणी केली होती. खिलच्या निघतात म्हणून सभागृहात मांडले होते. दोन दिवसात त्या पूतळयाला डिको पेन्ट मारला जातो हे इतिहासातील पहिली घटना आहे.स्थायी समिती मध्ये मुद्या उपस्थित केल्यानंतर लगेच सभापती स्थायी समिती तसेच काही जेष्ट सदस्य मा.आयुक्तांना सोबत घेवून पुतळयाची पाहणी केली असता पूतळा चकचकीत दिसून येत होता. पुतळयावर राजकारण करणारे वेगवेगळे असले तरी या कामात जे खाणारे जमात आहे.ते कुणीही सहन करणार नाही. पूढील दहा पंधरा दिवसानंतर त्या पुतळयाची विटबंना होत आहे खिलच्या निघत आहे. पूर्ण शहर पेटेल यास जबाबदार कोण. त्यासाठी या बाबतीत संबधीतावर ताबडतोब

ॲक्शन घेवून कडक कार्यवाही केली पाहिजे. धातू तज्ञाकडून चौकशी करावी पुतळा नेमका कशाचा आहे. जर चूक झाली असेल तर यापेक्षा मोठी चूक महानगरपालिकेच्या इतिहासात झाली नसेल त्यासाठी संबधीत जे कूणी दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी. पहिलीच घटना होवू शकते.

श्री.संजय केनेकर : विदयापीठ गेट समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा भव्य असा पूतळा उभारण्याचा ठराव या सभागृहाने एक मुखाने मान्य केला. त्याप्रमाणे अमलबजावणी अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. पुतळयाच्या खिलच्या निघतात हे निदर्शनास आले. अनेक विकास कामाचे ठराव या सभागृहात मंजूर केले जाते व अनेक कामा बाबत निष्कृष्ठ दर्जाचे काम झाल्या बाबत चर्चा होते. व चौकशी समिती नेमावी असे सातत्याने होत आले. पुर्ण नियंत्रक समिती महापालिकेकडे नाही. या समितीकडून या बाबी तपासणी होणे आवश्यक होते. त्या तपासणी केलेल्या आहेत की नाही यांचे गांभीर्य प्रशासनास वाटले नाही काय ?ते न केल्याने ही वेळ आलेली असून यात महानगरपालिकेची बदनामी व सभागृहाचाही अपमान होतो आहे हे विसरता येणार नाही.

श्री. कैलास गायकवाड : विदयापीठाला नाव देण्यासाठी सतत १७ वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनतेनी लढा दिला. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतर केले. संपूर्ण देशातील बहुजन समाजातील ओबीसी समाजातील लोक अभिवादन करून विदयापीठ गेट मधून जात असतात. ताबडतोब तेथील पुतळा बाजूला घेवून नव्याने पुतळयाचे अनावरण करावे.

श्री.कचरू मोरे :पुतळा ब्राँच आहे की वेगळया धातूचा आहे या बाबतीत या सभागृहात चर्चा होत आहे. शासनाचे कला संचालनालय म्हणून एक विभाग आहे. जेंव्हा पूतळा ज्यांचेकडून पूरवठा झाला त्यावेळी या विभागाचे एनओसी घेतलेली होती काय? धातू तज्ञाकडून तपासणी करून चौकशी करावी तेथील पूतळा काढून दुसरा बसविण्याची कार्यवाही करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : गेल्या स्थायी समितीमध्येही हा विषय चर्चेला आला होता. तसेच मागिल सर्वसाधारण सभेत यावर चर्चा करावयाची होती परंतू सभा संपविण्यात आली. पुतळयाच्या खिलच्या निघतात म्हणून चर्चा झाली तोच अधिकारी यांनी सदर पूतळयास डेको पेन्ट मारला व पुतळा चकचकीत केला. परंतू भविष्यात केंव्हाही खिलच्या निघू शकतात तसेच सदर पूतळा हा रस्त्यामध्ये असून केंव्हाही त्यावर वाहनाची धडक होवून नूकसान होवू शकते. त्यामूळे शहराचे वातावरण खराब होवू शकते.राजकारण होवून हे काम चांगले होत नसेल तर जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :देशात जागोजागी महापुरूषांचे पुतळे का बसविले जातात यांचे ध्येय व धोरण काय आहे याची जाणीव नागरीकांना असल्यामूळे जे की त्या महापुरूषांचा आदर्श या देशाने घेतला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी देशासाठी घटना तयार केली त्यात सर्व जाती धर्माच्या लोकांना अधिकार दिलेले आहे.अशा महापूरूषाचा पूतळा विदयापीठ गेट समोर उभारावा.अशी तमाम लोकांची मागणी होती. मागणी

केल्यानूसार पूतळा त्या प्रतीचा पुतळा बसविला नसेल तर त्या वेळी जे संबधीत अधिकारी होते त्यांचेवर कडक कार्यवाही करावी.

श्री.भगवान घडमोडे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूतळया संदर्भात अनेक सदस्यांनी मागिल घटनेची जाणीव करून दिली. ज्यावेळी पूतळा बसविण्यात आला त्यावेही आपण महापौर होते आजही आपण महापौर आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकराची प्रेरणा घेवून या देशात सर्व समाजासाठी त्यांनी विश्व उभे केले. त्यांचे नावाने जयजयकार करतो सत्ता भोगतो. त्यांनी लिहिलेल्या घटनेमूळेच सर्वांना सेवा सूविधा मिळत आहे .पुतळा उभारण्यामध्ये जर कूणी निष्काळजी पणा दाखवला असेल तर यापेक्षा दुर्दैव कोणते नसावे. जी प्रेरणा घ्यायची होती त्यात अधिकारी यांनी खिळ घालण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्यांना बघून सर्व समाजातील लोकांना प्रेरणा , शक्ती मिळते अशा महापूरूषांला विद्रूप करण्याचा प्रयत्न झालेला आहे.शासनाची एनओसीसाठी टेबल टू टेबल संचिका देवून परवानगी आणलेली आहे. हे जातीने नमुद करतो. या संदर्भात राजकारण न होता सखोल चौकशी करावी.जे दोषी निघतील त्यांचेवर पोलीसात गुन्हा दाखल करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: ५० लक्ष रूपये स्वेच्छानिधीतून देण्याची मान्यता करावी.

मा. महापौर : नगरसेवकांचा निधी देण्याची गरज नाही महानगरपालिकेचे काम आहे. बजेटमध्ये तरतूद आहे. आज त्यास मंजूरी दिली जाईल.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : ज्यांची संस्था आहे त्या महापुरूषांच्या पुतळयासाठी पीईएस सोसायटी जागा देत नाही.नंदनवन कॉलनीती जो डी. पी रोड आहे तो सुध्दा या संस्थेने बंद केलेला आहे.पीईएस सोसायटी जागा देत नसेल तर आम्ही अमरण उपोषणास बसू याची दखल घेण्यात यावी .

श्री.वसंत नरवडे : चांगला पूतळा असावा म्हणून सर्वांचीच इच्छा आहे. पीईएस सोसायटीला जागा मागवून हि दिली नाही. म्हणून तेथे आरक्षण टाकून लागणारी जागा घेण्यात यावी. बजेटमध्ये ५० लक्षचा निधी ठेवून तेथील नवीन पूतळा बसविण्याच्या कामास सूरूवात करावी.चांगले काम होईल याची दखल घेण्यात यावी.

सौ. खान अजरा जबीन :महापुरूषांचे पुतळे उभारण्यास हरकत नाही परंतू सरंक्षण तेसच सुरक्षित राहिल याची दखल घेवून वर्षातून एक वेळेस त्यांची दुरूस्तीचे ही काम झाले पाहिजे.

श्री.संतोष खेंडके : पूतळयासाठी पीईएस सोसायटीकडून जी जागा लागते ती आपण सर्वांच्या मदतीने घेण्याचा प्रयत्न करू पुतळा रस्त्यात असून त्या रस्त्यावरून मोठी रहदारी असते. कदाचित वाहनाने त्यास इजा होवून वाईट प्रसंग घडू शकतो. रस्त्याच्या बाजूला सुशोभिकरण करून स्थापीत करून नव्याने पूतळा स्थापन करण्याची कार्यवाही करावी.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना जाणून घेतलेल्या आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूतळा विदयापीठ गेट समोर असावा अशी सर्व जनतेची मागणी होती.सन २००० मध्ये मी महापौर असतांनाच तसा ठराव घेण्यात आला होता. त्यावेळी प्रशासनाकडून तसेच तज्ञाकडून यासाठी जवळपास ७० ते ८० लक्ष खर्च येईल असे सांगण्यात आले होते. आज जशा भावना स. सदस्यांनी मांडल्या तशाच

त्यावेळी ही मांडल्या होत्या व किती खर्च लागला तरी एक स्मारक उभारावे म्हणून मंजूरी देण्यात आली त्यानंतर विदयापीठाचे कुलगुरू तसेच पीईएस सोसायटीचे अध्यक्ष व सचिव यांना आम्ही स्वत: जावून जागे संदर्भात भेट घेतली होती. या विषयावर बरीच चर्चा झाली. त्या ठिकाणी पूतळा बसविणार म्हणून ठरले. हा पुतळा बसविण्यासाठी ज्या ज्या परवानगी लागतात त्या उपलब्ध झाल्या आहेत. सभागृहाची भावना लक्षात घेवून पुतळा हा ब्रॉन्झचा बनविलेला आहे की नाही याची तपासणी मेटल तज्ञ मा. आयुक्त यांनी करावी.आताच मी मा. आयुक्ताशी चर्चा करत होतो. तपासणीसाठी त्यातील एखादा तुकडा काढावा लागेल तो नेमका कोणता काढायचा या बाबतीत मा. भन्ती व मा. पोलीस आयुक्त यांचेशी चर्चा करावी लागेल.चर्चा केल्यानंतर प्रशासनाने मेटलचे जे शासकीय इंजिनियर असतील त्यांचेकडे एक तुकडा तपासणीसाठी पाठवावा.पुतळा करण्यासाठी त्यावेळी जी निविदा मागविण्यात आलेली होती त्याचीही तपासणी करावी. तेथील बेट चांगले सुशोभिकरण करावे दोन ठिकाणी यासाठी जागा बघीतली होती. विदयापिठाच्या डाव्या बाजूस विदयापीठ जागा देण्यास तयार होते. तसेच समोरची २०ते४० गुंठे कॉलेजची जागा घेवून तेथे उदयान करावे व विदयापीठकडे बोट करून असलेला तेथे पुतळा बसवावा अशा दोन प्रकारे चर्चा झाली होती. विदयापीठाच्या बाजूला पुतळा बसविल्यास बाजूला होईल व जाणारे येणाऱ्या नागरीकांना नमन करता येणार नाही म्हणून पुतळा हा समोर असावा असेच ठरले होते. परंतू पीईएस सोसायटीकडून जागा मिळाली नाही.या महापुरूषामूळे सर्व धर्माच्या गोरगरीब लोकांना न्याय मिळालेला आहे.म्हणून विदयापीठ गेट समोर चांगला पूतळा असलाच पाहिजे. त्यासाठी लागणारा खर्च एक कोटी लागत असेल तरी एखादे काम कमी करून ते करावे तसेच तेथे हायमास्ट व एक बेटाचे सुशोभिकरण करून तेथे कारंजे लावण्यात आले पाहिजे.तसेच आणखी काय काय सुविधा तेथे पाहिजे त्या बाबतीत त्या त्या सदस्यांनी तशा सुचना दयाव्यात. तेथील टपऱ्या काढून चौक मोठा करण्यात यावा. लवकरात लवकर मेटल तज्ञाच्या मार्फत एक तुकडा काढून शासकीय जी लॅबोरटीज असेल त्यांचेकडे तपासणीसाठी पाठूवन मा. आयुक्त यांनी तात्काळ अहवाल मागवून या सभागृहात सादर करावा. जर पुतळा करण्यामध्ये भ्रष्टाचार झाला असेल व निवेदेच्या मागणीनूसार पुतळा दिला नसेल तर ज्यांनी पूतळा दिला त्यांचेवर व त्यावेळी जे अधिकारी कार्यरत होते त्यांचेवर कडक कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना प्रशासनाला देण्यात येत आहे.

श्री.प्रशांत देसरडा : आताच स. सदस्य श्री. नरवडे पाटील यांनी सूचना केल्यानूसार या पूतळयासाठी जागा रिझर्वेशन करण्याचा ठरावा घेता येईल का घेता येत असेल तर ऐनवेळी आजच्या बैठकीत तसा ठराव पारीत करावा. जेणे करून पीईएस कॉलेज जागा देण्यास तयार होईल.

श्री.मिलींद दाभाडे : आपल्या कार्यकाळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूतळा बसविण्यात आला त्याबध्दल मी आपला आभारी आहे. परंतू आपल्या कार्यकाळात काही

अधिकारीयांनीभ्रष्टाचार करून गोलबोट लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. जो पूतळा सद्य स्थितीत आहे तो आम्हाला मान्य नाही. भव्य असा पूतळा उभारण्यात यावा.तसेच पुतळयाच्या भोवताली सुशोभिकरण करण्यात यावे त्यासाठी एक कोटीची तरतूद करण्याचे आदेशीत करावे.

मा. महापौर : आपण म्हटल्याप्रमाणे तसे प्रशासनास आदेशीत केलेलेच आहे. नवीन पूतळा बसविल्यानंतर सद्य स्थितीत असलेला पूतळा हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात यावा.

श्री.मिलींद दाभाडे : भविष्यात माजी पंतप्रधान राजीव गाधी यांचा पूतळा उभारण्यात येणार आहे त्यात भ्रष्टाचार होणार नाही याची दखल घेण्यात यावी.सोसायटी कडून जागा मिळविण्यासाठी संस्थेचे सदस्य श्री. गंगाधर पानतावणे हे शहरातच राहतात त्यांचेशी चर्चा करावी.

मा. महापौर : यानंतर जे ही पूतळे शहरात महापालिकेच्या वतीने बसविण्याची कार्यवाही होईल तेंव्हा ते सर्व पुतळे बॉन्झचा असेल.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : पीईएस सोसायटीची जागा देण्यास कूणाचा ही नकार नसेल.

मा.महापौर : पीईएस कॉलेजच्या जागेमधून डी. पी रस्ता होता. या पूतळयासाठी जागा मिळेल म्हणून तो डी. पी रस्ता रद्य केला तरी सूध्दा पीईएस सोसायटीकडून जागा मिळाली नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : तेंव्हाची परीस्थिती वेगळी होती. आता पून्हा चर्चा करावी. जर मागणी करूनही जागा दिली नसेल तर ही दुर्दैवी बाब आहे.आपल्या कार्यकाळात पूतळा व्हावा अशी अपेक्षा असून तेथील टपऱ्या त्वरीत काढण्यात यावे अशी सूचना करावी.

मा. महापौर : आजच्या कार्यक्रमासाठी मला बोलविले आहे. तेथील प्राचार्य यांचेशी चर्चा केली जाईल. व त्यानंतर जेष्ठ सदस्य पदाधिकारी जावून संस्थेचे सचीव यांची भेट घेवून चर्चा करू.संस्थेचे सदस्य श्री. पानतावणे यांची वेळ घेवून त्यांचेशीही चर्चा करता येईल रिझर्वेशनचा ठराव टाकल्यानंतर शासनाकडून त्यास मंजूरी येण्यास वेळ लागेल. चर्चेतून मार्ग निघत असेल तर रिझर्वेशन टाकण्याची गरज नाही. मागणी मान्य केली नाही तर टाकले जाईल.

श्री.अ.रशीद खान : स. सदस्य श्री. सलीम खॉन यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य केले ते मागे घेण्यात यावे.

मा.महापौर :माजी महापौर यांचे विनंती वरून स. स. श्री. सलीम खान यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य करण्याचा निर्णय मागे घेण्यात येतो.

श्री.अ. रशिद खान : घाटी दवाखाना जवळ फुटपॉथवर झालेले अतिक्रमण काढण्या बाबत मागिल बैठकीत निर्णय झाला होता. अदयाप कार्यवाही झालेली नाही.

प्रशासकीय अधि. : या रस्त्यावर १० ते १५ झोपडया होत्या एक महीण्यापूर्वी काढल्या होत्या तरी सूध्दा तेथील लोक गेले नाही. मागिल सभेत दिलेल्या सूचनेनूसार सदर लोकांचे झोपडयावरील पत्रे तसेच काही साहित्य अतिक्रमण पथकामार्फत काढून महानगरपालिकेत जमा केले आहे.

मा. महापौर : पून्हा तेथे जावून संबधीत अधिकारी यांनी पाहणी करावी. व तेथे अनधिकृतरित्या कूणीही बसणार नाही याची दखल घेण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा : प्रत्यक्ष जागेवर अतिक्रमण होत असतांना प्रशासकीय विभाग कार्यवाही करीत नाही एकदा अतिक्रमण काढल्यानंतर पून्हा कसे होते. संबधीतांवर पोलीस गुन्हा का दाखल केला नाही. अधिकारी हे नेहमी सभागृहाची दिशाभूल करतात. माजी महापौर श्री. तणवानी यांनी प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्याचे आदेशीत केले होते. का केलेली नाही.ते लायकीचे नाही. तसेच सहा इमारत निरीक्षकाच्या बदल्या केल्या त्यातील काही अदयाप त्याच विभागात आहे. श्री. संगेवार यांना अदयाप त्या विभागातून सोडण्यात आले नाही. कशासाठी त्यांना प्रशासकीय विभागात ठेवले आहे.

मा.आयुक्त : ज्याच्या बदल्या झाल्या होत्या ते सर्व त्या विभागातून गेलेले आहे. दुसरे असे की अधिकारी लायकीचे नाही हे शब्द इतिवृत्तातून वगळण्यात यावे.

श्री. कचरू मोरे : प्रशासकीय अधिकारी हे खरोखरच सक्षम नाही. त्यांची त्वरीत त्या विभागातून बदली करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे :प्रशासकीय अधिकारी हे सूचना करूनही कार्यवाही करीत नाही म्हणून भावनेच्या भरात स. सदस्य संतापून बोलतात. मा. आयुक्त हे प्रशासनाचे प्रमुख असतांना त्यांनी मा. महापौरांची परवानगी घेतली नाही व अमुक शब्द वगळावे म्हणून म्हटले. कुणीही सदस्य कोणत्याही अधिकाऱ्याचा अवमान होईल असे बोलत नाही परंतू या सभागृहाने निर्णय घेतलेला असेल तर त्यानूसार कार्यवाही होणे अपेक्षीत असते.जनतेची विकास कामे व्हावी हीच अपेक्षा सदस्यांची असते. कुणाचे उल्लघंन व्हावे असे वाटत नाही. दोन्ही बाजूनेही चूका होतात. सभागृहाच्या भावनेचा प्रशासनाने आदर करावा तरच सभागृहही प्रशासनाचा आदर करेल. त्यासाठी प्रशासनाने चूक करू नये सभागृहालाही चूक करण्यास भाग पाडू नये.

श्री. संजय सिरसाट : निवडून आल्यानंतर जनतेसाठी काम करावे लागते. ही माझी धारणा आहे व होती. परंतू ही भावना आता माझी कमी झालेली आहे. जर पक्षाच्या विरोधात काम केले पक्षातून काढले जाते. किंवा नागरीकाच्या विरोधात काम केले तर पाच वर्षानंतर ते नागरीक पून्हा निवडून देणार नाही.परंतु अधिकाऱ्याच्या विरोधात कुणीही काही बोलले तरी वरीष्ठ पातळीवर रिपोर्ट जावू शकतो असे अधिकाऱ्याचे मत झालेले आहे. बैठकीमध्ये जे निर्णय होतात त्याची अमलबजावणी काय होते त्याचा अहवाल आला पाहिजे अशी अनेक बैठकीत चर्चा झालेली होती व तशी सर्वांचीच भावना आहे.केसरसिंग पूरा येथे महानगरपालिकेची जवळपास एक कोटी किमतीची जागा असून तेथील अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात मागिल दोन महिण्यापूर्वी आदेशीत केले होते. परंतू श्री.निकम यांनी कार्यवाही केलेली नाही केली असेल तर तसा खूलासा त्यांचेकडून घेण्यात यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: प्रशासकीय अधिकारी यांना जे काम दिले ते कठीन आहे त्यात अतिक्रमण तोडणे त्यात नगरसेवकांचा विरोध असतो. ते काढावे म्हणून प्रशासनाचा दबाव असतो. यात कामात दोषी कोण आहे याची प्रशासनाने कमेटी तयार करावी . स.

सदस्यांच्या बोलण्याला महत्व दिले जात नाही जे महत्व आहे ते प्रशासनाकडे आहे हे दाखविले जात आहे. हे सभागृह सर्वोच्च आहे. पॉलीसीचे निर्णय घेण्याचे अधिकार या सभागृहाला आहे. एक एक टपरी काढून पूनर्वसन केले असते तर या अडचणी आल्या नसत्या. श्री.आनंदकर यांनी त्यांचे अधिकाराच्या व्यतिरिक्त काम केले. बाजाराचे आरक्षण करून टाकले. त्याबाबतीत गुन्हा दाखल झाला हे प्रशासन पाहिल परंतू हे सर्व जनतेच्या समोर जात आहे.

श्रीमती.कला बोरामणीकर: निराला बाजारा येथील चौकाच्या बाजूला एका व्यक्तीने मोठे दगडाची भिंत बाधून अतिक्रमण केलेले आहे. या बाबतीत मी अनेक वेळा पत्र देवून तसेच सभागृहात मूद्या मांडला कार्यवाही झाली नाही. तेथील मोजमाप होवून झालेले अतिक्रमण काढले गेले पाजिजे. दोन दिवसापूर्वी तेथे पाण्याची लाईन फुटली. वार्डातील जनता आम्हाला धारेवर धरतात.तसेच वरद गणेश मंदीर समोर मोठया प्रमाणात टपऱ्या आहेत त्वरीत काढाव्यात.

श्री.संजय रिडलॉन : रविवार बाजार येथील अतिक्रमण काढण्यात आले परंतू माझ्या वार्डात एका शाळेच्या बाजूला अतिक्रमण झालेले आहे.अनेक वर्षापासून न्यायालयात प्रकरण चालू आहे. त्याकडे प्रशासन लक्ष देत नाही. तेथे मा. आयुक्त यांनी भेट ही दिलेली होती.

श्री.प्रशांत देसरडा : अतिक्रमणाच्या बाबतीत विभाग प्रमुख यांचेकडून खूलासा घेण्यात यावा.प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्याचे तत्कालीन महापौर यांनी आदेशीत केलेले होते त्या बाबतीत का कार्यवाही झालेली नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : वारंवार चर्चा करून दबावा खाली आणून संबधीत अधिकाऱ्याकडून काही तरी कूणाला कामे करून घ्यायची आहे का असा माझा प्रश्न आहे. या विभागात कोणतेही अधिकारी दिल्यास त्यांचेवर दबाव असणार आहेच. काही ठिकाणी बांधकाम परवानगी असते सर्व पूर्तता केलेली असते परंतू स. सदस्यांना विचारले नाही म्हणून कार्यवाही होते. ही पध्दत बंद करावी.अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस यंत्रना दयावी लागेल.

श्री.संजय सिरसाट : प्रशासकीय विभागात पोलीस कर्मचारी आहे. त्यांचेवर महानगरपालिका ५० लक्ष रू. दर वर्षी खर्च होते.त्या कर्मचाऱ्याकडून काम करून घेतले जात नाही.

श्री.सय्यद खुसरो : माझ्या वार्डात १० प्लॅटचे अनधिकृत काम दोनशे वर्षापूर्वीची दगडाची भिंत तोडून होत आहे. परवानगी रद्द झालेली असून त्याची प्रत प्रशासनाकडे आली असून सूध्दा कार्यवाही केलेली नाही. महानगरपालिकेची जवळपास १० हजार क्वेअर फुट जागेवर अतिक्रमण झाले ते काढण्यास पत्र दिले कार्यवाही होत नाही.

सौ. रजनी जोशी : टी. व्ही. सेन्टर चौक ते अहिल्या बाई होळकर चौक पर्यत अनेक रस्त्यावर हातगाडया उभ्या असतांना आपण स्वत: पाहणी करावी. प्रशासकीय अधिकारी यांना विभाग प्रमूख यांनी अनेक वेळा तेथील अतिक्रमण हटविण्यास कळविले परंतू अदयाप कार्यवाही केलेली नाही. स. सदस्यांनी सूचना करूनही कार्यवाही होत नाही. प्रशासन अधिकाऱ्यांची बाजू घेते. हे बरोबर नाही.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : शहरातील अतिक्रमणे काढतांना भेदभाव केला जातो. सर्वात जास्त प्रमाणात अतिक्रमणे या वर्षी काढण्यात आलेले आहे. परंतू काही अतिक्रमण काढण्याासाठी उपोषणास बसावे लागते. तरी काढले जात नाही. माझ्या वार्डात अनेक ठिकाणी टपऱ्या असून तेथे पत्त्याचे क्लब चालू असतात. ते काढले नाही. यासाठी एक कमेटी नियुक्त करावी व जेथे जास्त प्रमाणात अतिक्रमण होत आहे ते त्वरीत काढावे.

श्री. प्रशांत देसरडा : प्रशासकीय अधिकारी श्री.निकम यांची बदली करण्याचे मा. महापौर यांनी आदेशीत केले होते प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : बदल्या करण्याचे अधिकार प्रशासनास आहे.

सौ. कला बोरामणीकर : अतिक्रमण न हटविण्यास प्रशासनास काय अडचणी येतात याचा खूलासा करावा.

श्री.सलीम खान : गरीब लोक फुटपॉथवर राहतात. त्यांना पर्यायी जागा देवू म्हणून आश्वासन दिले होते दिली नाही त्यामूळे ते रस्त्यावर राहतात. अतिक्रमण काढले फूठपाथ तयार केले त्यावर किती खर्च झाला ठेका कूणी घेतलेला होता वर्क ऑर्डर काढलेली होती का याचा खूलासा होणे गरजेचे आहे.

श्री. मोहन मेघावाले : टी. व्ही सेन्टर चौकातील दुकानासमोरील अतिक्रमण काढण्यात यावे दुकानदार टपरीधारक हातगाडीवाले यांचेकडून हप्ते वसूल करतात. तसेच अहिल्याबाई होळकर चौकातील मोठमोठया हॉटेल मालकानी रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे या रस्त्यावर मोठी रहदारी असते. तसेच जळगाव रोड वरील अतिक्रमणही काढण्यात यावी.

सौ.खान अजरा जबीन : शहरात मोठमोठया अनधिकृत इमारतीचे बांधकाम काढले जात नाही परंतू गरीब लोकांच्या झोपड्या, टपऱ्या काढल्या जातात.हे योग्य नाही. जेथे अतिक्रमण आहे ते हटविले जात नाही जेथे नाही तेथे जावून हटविण्याचा प्रयत्न होवून पैसे घेतले जाते. रेकॉर्ड नूसार जे रस्त्यावर अतिक्रमण झालेली आहे ती काढण्याची कार्यवाही अगोदर करावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान: निराला बाजार येथील पार्कीगच्या बाजूचे अतिक्रमण अदयाप हटविण्यात आलेले नाही. तसेच भडकल गेट जवळील तसेच जालना रोडवरील अतिक्रमण अगोदर हटवावे. नंतर इतर हटवावे. गरीब लोकाचे हटवू नये काढायचे असेल तर त्यांना पर्यायी जागा देण्यात यावी. अनेक लोकांनी इमारतीसमोर २० फुटापर्यत रस्त्यावर अतिक्रमण केले अनेक वेळा पत्र दिले जाते परंतू कार्यवाही होत नाही.मा. न्यायालयाचे आदेशाचे ही पालन केले जात नाही.

श्री.वसंत नरवडे : २५ टक्के जूने शहर असून बाकी सर्व अनधिकृतच भाग आहे. मुंबई सारखे या शहरात दोन पथक अतिक्रमणाचे फिरते असावे जेणे करून अतिक्रमण होणार नाही व काढलेले त्या पून्हा होणार नाही.

श्री. बाबासाहेब डांगे : मुंकूदवाडी भागात मागिल सहा महिण्यापासून एक अतिक्रमण काढले नाही समोरच्या व्यक्तीला न्यायालयात जाण्यासाठी संधी दिली. अतिक्रमण करणार व्यक्ती महानगरपालिकेचा श्री.जैस्वाल त्यांचे नाव आहे. मा.न्यायालयाचा त्या

व्यक्तीने स्थगिती आदेश आणले होते तो स्टे व्हॅकेट झालेला असताना ते अतिक्रमण काढले जात नाही.तसेच भाजी मार्केट हटविले नाही. अतिक्रमण हटविण्यासाठी ठोस निर्णय आजच्या सभेत घेण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री.मिलींद दाभाडे : अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही जशी मिलकॉर्नर,सेन्ट्रल नाका तसेच घाटी परीसरात केली त्या प्रमाणे शहरात गुंलमडी निराला बाजा तसेच कुंभारवाडा या भागातही मोहिम राबवावी.

श्री.प्रल्हाद निमंगावकर : नवीन इमारत निरीक्षक नियुक्त केले परंतू त्यांचेकडे मोबाईल आहे किंवा नाही नंबर काय आहे संपर्क कसा करायचा काहीच माहिती नगरसेवकांना दिलेली नाही.

मा. महापौर : प्रत्येक इमारत निरीक्षक यांची झालेली नियुक्ती व त्यांचे मोबाईल नंबर सर्व सदस्यांना देण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : श्री. खुसरो यांचे वार्डात बांधकाम परवानगी रद्य झाली असतांना इमारतीचे काम चालू आहे.

श्री.संजय जगताप : भडकल गेट जवळ योगेश जोहरी नावाचे बिल्डर यांनी पाच मजली इमारत बांधलेली असून त्यांकडे अतिक्रमण विभागाचे दुर्लक्ष होत आहे. अतिक्रमण हटविण्यासाठी पथक निर्माण करावे त्या पथकाने दिवसभरामध्ये कूठे कार्यवाही केली अहवाल घ्यावा. जर कार्यवाही केली नसेल तर त्या पथकावरही पनींशमेंन्ट करावे.

मा. महापौर : प्रशासकीय विभागाकडे अतिक्रमण हटविण्यासाठी पथक आहे. तरी सूध्दा या विभागाकडे एक मोबाईल अतिक्रमण व्हॅन ठेवण्यात येईल. शहरात कूठे अतिक्रमण होते हे स.सदस्यांना कळविता येईल.

श्री.नासेर नहदी : औरंगाबाद शहर ऐतिहासीक शहर आहे. या शहरात जे ही ऐतिहासीक स्थळ आहे तेथे आजूबाजूला मोठया प्रमाणात अतिक्रमण आहे ते काढले जात नाही.

श्री.भगवान घडमोडे : बदली करण्या संदर्भात चर्चा झाली. ते करून सूध्दा काहीही सफल होत नाही याचा अनुभव आलेला आहे. पूर्वीचे कर्मचारी काम करीत नव्हते आताचेही काम करीत नाही पून्हा बदली करणार काय? बदली करणे हा पर्याय नाही. संबधीत अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. केवळ बदल्या करून त्या कर्मचाऱ्याची त्या विभागात काम करण्याची मानसिकता राहत नाही.शहरात अनेक ठिकाणी अनधिकृत २० बाय ३० ची प्लॉटींग चालू आहे. ती बंद करावी.

श्री.संजय रिडलॉन : पैठण गेट जवळील रस्त्यावर एका इमारतीचे काम अर्धवट असून त्या बाजूला ज्यूस सेंन्टर गॅरेज, मोबाईल शॉपस् तसेच इतर मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. माझा स्वत: त्या रस्त्यावर दोन वेळेस अपघात झालेला होता.

श्री.दिलीप गायकवाड : अमरप्रित हॉटेलच्या बाजूला १०० फुटावर एका बिल्डरने विना परवानगी राजतारा नावाची इमारत बांधलेली असून ९ दुकाने अनाधिकृत रित्या काढलेले आहे.त्या संदर्भात न्यायालयात प्रकरण चालू असून माझ्या माहिती प्रमाणे सदर अतिक्रमण ताबडतोब काढावे म्हणून मा.न्यायालयाचे आदेश आहे.का कार्यवाही झालेली नाही?

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : अतिक्रमणे नेहमी ओपन स्पेस मध्ये होतात. माझ्या वार्डात किती ठिकाणी खुल्या जागा असून किती जागेवर अतिक्रमण झालेले आहे व किती जागेचा वाद न्यायालयात आहे दोन वर्षापासून मागणी करतो माहितीच्या अधिकारात दोन वेळेस माहिती मागविली माहिती दिली नाही. आठ दिवसात माहिती देण्याचे आपण मागच्या बैठकीत आदेशीत केले होते मला माहिती अदयाप दिलेली नाही.यासाठी मा. न्यायालयात दाद मागवावी लागेल काय या बाबतीत आश्वासन दयावे.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेता ७० ते ८० टक्के भागात अतिक्रमण होत आहे. त्यात टपऱ्या असतील. अनधिकृत बांधकाम ,खुल्या जागेवरील अतिक्रमण ,वरद गणेश मंदीर समोरील अतिक्रमण निराला बाजार , नंदनवन कॉलनी ,रविवार बाजार येथील अतिक्रमण असेल हे किंती दिवसात काढणार आहे प्रशासकीय अधिकारी यांनी खूलासा करावा.

प्रशासकीय अधि. :निराला बाजार येथील दगडाचे जे अतिक्रमण झालेले आहे काढण्यासाठी गेलो असता जे दगड टाकलेले आहे ते आमच्या स्वत: च्याच जागेवर आहे असे संबधीत व्यक्तीनी म्हटले आहे. सदर दगडाचा ढिगार हे रस्त्यावर आहे की नाही किंवा मार्कींग करून देण्यासाठी दिं. ४.८.२००६ ला पत्र दिलेले आहे. मार्कींग करून दिल्यानंतर कार्यवाही करता येईल.

सहा. संचालक(न.र.) :निराला बाजार येथील सर्कल मधील मार्कींग दोन दिवसात केली जाईल.

मा.महापौर : जागेची ताबडतोब मोजणी करावी अतिक्रमण असेल तर तात्काळ काढावे.वरद गणेश मंदीर समोरील टपऱ्याही त्वरीत हटविण्यात याव्यात.प्रशासनाने लवकरच मोबाईल व्हॅन ठेवावी व त्यानूसार जेथे अतिक्रमण झाले असेल स. सदस्य कळवतील त्यानूसार अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केली जाईल.

श्री.संजय रिडलॉन : मॉडल मिडल शाळेच्या अतिक्रमाच्या बाबतीत खूलासा करावा.

मा. महापौर : शहरात बऱ्याच ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. सभागृहात जे निर्णय घेतले जातात त्यांचे ॲक्शन पाईंन्ट लिहून घेण्याचे सचिवांना आदेशीत केलेले आहे. त्यानूसार त्वरीत ॲक्शन पाईन्ट त्या त्या विभागाकडे जावून कार्यवाही होईल.

श्री. प्रशांत देसरडा : दि. २४.१०.०७ च्या बैठकीत प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्याचे तत्कालीन महापौर यांनी आदेशीत केले होते त्याची अमलबजावणी का केलेली नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: जे मूद्दे आतापर्यत उपस्थित झालेले आहे त्याची कार्यवाही कोणत्या स्तरावर आहे प्रशासनासोबत आपल्या दालनात बैठक बोलवावी. निर्देश दयावे.

श्री.मधुकर सावंत : इमारत निरीक्षक प्रशासकीय अधिकारी यांची बदली करण्यात यावी म्हणून मागिल बैठकीत निर्णय घेतला होता इमारत निरीक्षक यांच्या बदल्या केल्या परंतू प्रशासकीय अधिकारी यांची बदली का झालेली नाही.

श्री.प्रशांत देसरडा :प्रशासकीय अधिकारी यांची बदली केली नाही याचा प्रशासनाने खूलासा करावा.

मा. महापौर : इतिवृत्ताची पाहणी करून माहिती दिली जाईल.या सभागृहात प्रश्न उपस्थित केल्यानंतर लगेच उत्तर दयावे ही अपेक्षा असते परंतू लगेच उत्तर देणे शक्य नाही

करीता नियमानूसार प्रश्न विचारावे त्याचे रितसर उत्तर दिले जाईल. जर त्या उत्तरावर समाधानी आपण नसाल तरच चर्चा केली जाईल.

श्री.प्रशांत देसरडा : सात दिवस अगोदर विषयपत्रिका येणे आवश्यक आहे तसे न होता अदयाप पर्यत पूरवणी विषय पत्रिका मिळालेली नाही. काय चर्चा करायची.

मा. महापौर : या बाबतीत प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉ : विकास कामे होत नाही अधिकाऱ्याबरोबर चर्चा करावी.बजेट जास्तीची रक्कम दाखविली जाते वसूली होत नाही अस्थापनेवरचा खर्च मोठा होत आहे विकास कामे कोणतीही होत नाही.

मा. महापौर : ठिक आहे सर्व पक्षाचे काही जेष्ठ सदस्य यांचे समवेत अधिकाऱ्याची बैठक घेतली जाईल विकास कामाच्या संदर्भात चर्चा केली जाईल.कोणत्याही विकास कामाची संचिका दोन दिवसाच्या वर टेबलवर मंजूरी साठी राहू नये. शहरात जे अतिक्रमण झालेले आहे प्रशासनाने ते काढावे.

सौ. रजणी जोशी : वर्षाचे १० महिने झाले एक विकास कामे होत नाही. उशीर का लागतो खूलासा करावा.

सौ. दिपाली पाटील : सिडको हस्तातरण झाले म्हणून महापालिकेस १५ कोटी मिळाले आजपर्यत कोणतेही वार्डात विकास कामे झाले नाही.१० लक्षचे काम दयावे ते तातडीने केली जातील असे आयुक्तांनी आश्वासन दिले होते तेही केलेले नाही.

मा. महापौर :ज्या कामाचे टेंडर काढलेले असतांना वर्क ऑर्डर झालेल्या नाही. अशा सदस्यांच्या भावना आहेत. या बाबतीत लवकरात लवकर वर्क ऑर्डर देवून कामे चालू करावी. कोणत्या वार्डात कोणती कामे चालू आहे यांची माहिती स. सदस्यांना देण्यात यावी.सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दु. ३.४५ वा. पून्हा सभेला सुरूवात ४.३० वा.)

**विषय क्र. ६८७/१ :**

दिनांक १५.१२.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत कायम करणे.

**संवाद :**

श्री.किशनचंद तणवाणी : इतिवृत्त हे पूरवणी विषय पत्रिकेसोबत दिलेले आहे पूरवणी विषय पत्रिका अदयाप मिळालेली नाही त्यासाठी हा विषय स्थगित ठेवून पूढील बैठकीत घेण्यात यावा.

मा. महापौर : ठिक आहे इतिवृत्त पूढील बैठकीत कायम करण्यात येईल.

**ठराव :**

दिनांक १५.१२.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त पुढील बैठकीत कायम करण्यांत येईल,असे ठरले.

**विषय क्र. ६८८/२ :**

मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, जकात कर हा औरंगाबाद महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. सद्यस्थितीत महानगरपालिका हद्दीत आयात होणाऱ्या मालावरील जकात कराची वसूली मे.सहकार एजन्सी प्रा.लि. (जकात संकलन अभिकर्ता) यांच्या मार्फत दि.१.३.२००६ ते २८.२.२००७ या कालावधी करीता करण्यासंबंधी महानगरपालिकेच्या मा.स्थायी

समितीने मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम -१९४९ मधील परिशिष्ट ''ड'' प्रकरण-८ मधील कराधान नियम-३५ नुसार ठराव क्र.२३६ दि.२३.२.२००६ अन्वये जकात कराची वसुली खाजगी अभिकत्यामार्फत करण्यात येत आहे.

सन २००६-०७ या वर्षाकरीता जकात कराची वसुली खाजगीकरण करण्यासाठी व त्याच बरोबर जकात कराचे सुसुत्रीकरण (Rationalization) करण्यासाठी प्रस्ताव सादर केला असता मा.सर्वसाधारण सभेने जकात दाराचे सुसुत्रीकरण संदर्भात प्रशासनाने प्रस्तावित केलेले व स्थायी समितीने शिफारस केलेले हे दोन्ही प्रस्तावित जकात दर नामंजूर करून विद्यमान जकात दर विचारात घेवून जकात कराची वसूली खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यास मंजुरी देण्यात आलेली होती.

वरील बाब लक्षात घेता सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी जकात कराची वसुली पुन्हा खाजगी अभिकर्त्यामार्फत करावयाची झाल्यास जकात कराचे सुसुत्रीकरण करणे आवश्यक असून या संदर्भाने खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. औद्योगिक वसाहतींना चालना मिळण्यासाठी महानगरपालिका हद्दीत बंद पडलेल्या व महानगरपालिका हद्दीत नव्याने सुरू होणाऱ्या उद्योजकाकरीता आयात मालावर चार वर्षाकरीता प्रथम जकात करामध्ये सवलत देण्यासाठी जकात नियम-२ (२१) नंतर २२ व्या पोट नियमाची दुरूस्ती करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२३१ दि.११.८.०६ रोजी संपन्न झालेल्या सभेने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास शासन मान्यतेसाठी दि.२८.८.०६ रोजी पत्रकान्वये शासनास सादर केला आहे.

२. सर्व भाषेतील सर्व प्रकारच्या पुस्तकावर जकात कर माफीबाबत मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.२७०/३ दि.१९.६.२००६ अन्वये सर्व पुस्तकावर पुढील आर्थिक (एपिल-२००७ पासून) वर्षापासून जकात कर माफ करण्यास मा.सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली असून त्यानुसार सदर प्रस्ताव शासनास दि.७.१०.२००६ रोजीच्या पत्रकान्वये शासन मान्यतेस्तव शासनास सादर करण्यात आलेला आहे.

सन २००७-०८ या वर्षात जकात कराचे खाजगीकरण करण्यापूर्वी जकात पात्र आयात मालाच्या सारखेपणामूळे जकात दरातील मतभिन्नता व संदिग्धंता टाळण्यासाठी जकात दर अनुसूची ''ओ'' मध्ये काही अंशी बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार जकात दर अनुसूची ''ओ'' मधील काही प्रमाणात बदल करण्यासाठी सोबत सुधारीत जकात दर पत्रकाचे विवरण जोडण्यात येत आहे. त्यावर महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी नुसार कायदेशीर कार्यवाही पूर्ण करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.किशनचंद तणवाणी : प्रशासनाचा खूलासा होणे अपेक्षीत आहे.

मा. आयुक्त :मागिल वर्षी जकात खाजगीकरण करण्यात आले वसूली करतांना दराच्या बाबतीत काही वाद ,सभ्रम निर्माण झाले होते ते दूर ठेवण्यासाठी हा विषय ठेवलेला आहे.कमी जास्त करून ते तितकेच राहते फक्त ३४ लक्ष चा फायदा यामूळे होणार आहे. शासनापर्यत गेल्यानंतर मंजूर होणार की नाही याचा फरक पूढील टेंडरवर पडू नये म्हणून बॅलेन्स केलेला होता यामध्ये काही ॲटमस् बघितले ज्यामूळे वाद निर्माण झाला होता जसे एएनसी मशीन आहे ते मशीन आहे की संगणक आहे तसेच एमटी गॅस सिलेंडर आहे ८६ मध्ये ४ टक्के टाकले जात होते ते जास्त होते. तसेच बल्क ड्रक्स बध्दल सभ्रम होता महापालिका त्यावर १ टक्का घेत जकात

आकारत होती खाजगी अभिकर्ता यांचे मत आहे की २.७५ टक्के घ्यायला पाहिजे. हे सभ्रम पूढील वर्षी येवू नये म्हणून दोन्हीला २ टक्के केलेले आहे.यात फायदा ना तोटा जर शासनाने मंजूर केले तर संबधतानी ३४ लक्ष जास्त भरणा करणार. मागील वर्षी ज्या अडचणी आल्या त्यासाठी हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

श्री.किशनचंद तणवानी : शेडयूल ओ मध्ये जवळपास २००० वस्तू येतात. यात १३ दिलेल्या आहेत. यात सिगरेटचे मळीचे ही २ टक्केहून ६ टक्के केले. यामूळे किती फरक पडणार आहे.प्लेन पेपर चेही वाढविले आहे.

मा. आयुक्त :जे काही नूकसान होणार आहे ते भरून काढण्यासाठी तबांखूवर वाढविलेले आहे. जर्दा, तसेच सायकलवर ४ टक्के तसेच मोटारसायकलवर १.५ टक्के होते सर्वांना एकत्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

श्री.सजंय सिरसाट : ॲटम क्र १० वर ज्या वस्तूवर जकात घ्यायला नको पाहिजे त्याचे एक टक्कनी वाढ केली.सिगारेट दारूवर सध्या किती टक्के जकात आकारली जाते.गॅस सिलेंडरवर वाढविलेले आहे.

मा. आयुक्त : दारूवर ७ टक्के वूसल केले जाते.गॅस सिलेन्डरवर कमी झालेले आहे. जे बोर्ड ॲटममध्ये नाही ते ८६ मध्ये ४ टक्के आकारले जाते. ते जास्त होते

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: दोन टक्के दर आहे त्यास २.५ टक्के केले. चार टक्के करावयास पाहिजे होते.

मा. आयुक्त :एमटी गॅस सिलेन्डर हा ॲटम आपल्याकडे नव्हता.

श्री.किशनचंद तणवाणी : एमटी गॅस सिलेडर नव्हते परंतू शेगडी लायटर हे होते त्याचे २ टक्केचे अडीच होत आहे.

मा. आयुक्त : कारण बॅलेस करायचे आहे.

श्री.किशनचंद तणवाणी : हे सर्व ॲटम शेडयूल ओ प्रमाणे जकात कमी जास्त करण्यासाठी यासाठी विशेष सभा आयोजित करावी. तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा नसता रद्य करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जकात खाजगीकरण केले. एक महिणा बाकी आहे. १०१ कोटीपैकी किती वसूली झालेली आहे. तसेच ७.५० कोटी माफ करण्याचे वृत्तपत्रात आले त्याचाही खूलासा करावा. जकात खाजगीकरण करायचे की नाही हा अधिकार सभागृहाचा होता. असे असतांना मा. आयुक्तांनी कोणत्या नियमाने टेंडर काढलेले आहे.१०९ कोटीवरून १०१ कोटीवर आणले. या वर्षी नैसर्गीक वाढ पकडता या वर्षीचे टेंडर ११८ कोटीपर्यत दयावयास पाहिजे होते. टेंडर काढतांना नवीन नियम अटी टाकल्या गेल्या जेणे करून त्याच ठेकेदारास ते मिळाले .

श्री.काशिनाथ कोकाटे : जकात कराचे सुसुत्रीकरण करण्यासाठी ठराव सादर केला असा उल्लेख यात केलेला आहे.जकात खाजगीकरणाचेउद्दिष्ट हे १०८ ते १०९ कोटी ठेवण्यात आले. मागिल वर्षी सूध्दा एवढेच ठेवले होते. १९८८ पासून लोकप्रतिनिधी बॉडी आली. १७ अर्थसंकल्प या लोकप्रतिनिधीच्या मार्फत ठेवण्यात आले. जकातीचे उद्दिष्ट हे दरवर्षी वाढ केले व त्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी प्रयत्न ही केलेले आहे. त्यानूसार दरवर्षी ही १६ टक्केची वाढ झालेली आहे. मागिल वर्षीचे बजेट बघीतले तर त्यात अनेक टिका टिप्पणी झालेल्या आहे. १०९ कोटीचे उद्दिष्ठ या वर्षी ठेवण्यात आले. नैसर्गीक वाढ ही कमी ठेवलेली आहे. जकात चोरी

जवळपास १० टक्के होते दंड आकारला जातो. असे करूनही २५ ते ३० लक्ष पेक्षा जास्त रक्कम आलेली नसेल. जकात खाजगीकरण केले. उत्पन्न मिळावे म्हणून ते करायचे होते. अनेक व्यापाऱ्याचे मूळ मालाची किमंत ही जास्त लावून जकात आकारणी केलेली आहे. एक शेतकरी पिसादेवीला जूने जनरेटर घेवून जात होता. त्यांनी ते ढोरेगाव येथून आणले होते. अधिकारी ऐकायला तयार नाही. ५००० ची मागणी केली. १००० पर्यंत आले.अमुक व्यक्तीकडे मी जातो म्हणून संबधीत व्यक्ती म्हणाले १००० ते ५००/-रू. दयावे कूणाकडे जावू नका असे अधिकारी मार्गदर्शन करतात. जकात विभागात अधिक्षक म्हणून अधिकारी आहे. जे फार काळ जनतेच्या निगडीत राहू शकत नाही. त्यापैकी हा एक अधिकारी आहे. वार्ड कार्यालय अ मध्ये त्याची बदली केली होती पून्हा प्रमोशन म्हणून त्यांना जकात अधिक्षक पदी नियुक्त केले. दंड वसूल करण्या ऐवजी अधिकारीच वसूली करीत आहे. अधिकारी जकात विभागात कशासाठी ठेवलेले आहे. गरवारे कंपनीचा बिजनेस कमी झाला असा खूलासा प्रशासन करू शकते, एका कंपनीमूळे जर सात कोटी कमी जकात वसूल होत असेल तर उर्वरीत ज्या जास्तीच्या कंपन्या येत आहे त्या माध्यमातून मिळणारा जकात हा मोठा राहणार आहे. आता जकातीचे टेंडर काढलेले आहे. कलम ३५ (३) चा अधिकार मा.आयुक्तांना आहे. ते मंजूर करायचे की नाही हा स्थायी समितीचा अधिकार आहे. या सभागृहाचे मत व प्रशासनाचे एक मत झाले असते तर उद्दिष्ट चर्चा करून जास्त ठेवता आले असते. यात महापालिकेचा फायदा झाला असता. उद्दीष्ट का कमी ठेवण्यात आले कोणता बेस वापरला आहे. एकीकडे सुसूत्रीकरणाचा प्रस्ताव येतो खाजकीकरणाची निविदा येते ज्या अटी शर्ती टाकलेल्या आहे जे वस्तूचे दर ठरवून दिलेले आहे. यात दोन वस्तुचे दर असे केले आहे की शासन त्यास विखंडीत करणार आहे. त्यामूळे ५ कोटीचे उत्पन्न कमी होणार आहे. जकातीचे सुसूत्रिकरण केल्यानंतर निविदा काढावयास पाहिजे होती. निविदाच काढायच्या होत्या तर सुसूत्रिकरणाचा प्रस्ताव दयायचा नसता असे माझे स्वत: चे मत आहे. मी सभापती असतांना जकातीचे उत्पन्न घटविले नाही. जो सभागृहाचा अधिकार आहे तो सभागृहालाच राहू दयावा. जो प्रशासनाचा आहे तो प्रशासनाने वापरावा.

श्री.प्रशांत देसरडा : हा प्रस्ताव सादर केला हे अधिकार तरी सभागृहाचे आहे याची जाणीव प्रशासनाने ठेवली. याच प्रस्तावात खालील ओळीत दिले की सन २००७-०८ या वर्षासाठी जकात वसूलीचे खाजगीकरण करायचे असल्यास सुसूत्रीकरण करणे आवश्यक आहे. जकात खाजगीकरणाची निविदा काढली वृत्तपत्रात आले. या सभागृहाने जकात वसूली करण्यासाठी निविदा काढण्यास एक वर्षासाठी मंजूरी दिलेली होती. जे काही उद्दिष्ठ ठेवले ते १०९ कोटी ठेवले आहे ती चूक झाली असावी कारण मागिल वर्षीही १०९ कोटीचेच पहिल्यांदा उद्दिष्ठ ठेवलेले होते. १०९ कोटी कशाच्या अधारे ठेवले त्यावर दिनांक २२.१२.२००५ बैठकीत कार्यरत असलेले आयुक्त यांनी दीड पानाचे संभाषण केलेले आहे. स्थायी समितीला प्रशासनाने एक ठराव दिला की ट्रान्झीस्ट फिस ही ५० रू. ऐवजी १०० रूपये घ्यायचे. तो ठराव

शासनाकडे प्रलंबीत आहे. जर महानगरपालिकेला उत्पन्न वाढत असेल तर शासन शक्यतो असे ठराव मंजूर करतात. शासनाने मंजूर केले तर पाच कोटी जास्त वसूली होईल. असे यात नमूद आहे. जर शासनाने नामंजूर केले तर येणाऱ्या टेंडरमधून पाच कोटी वजा करून दिले जातील असे मा.आयुक्तांच्या प्रिबीड बैठकीमधे झाले. याचा अर्थ १०९ कोटीतून पाच कोटी ही कमी होवू शकते. एक वर्षासाठी निविदा काढण्यास मंजूरी दिलेली होती. जे टेंडर आलेले आहे त्यास मंजूरी या सभागृहाची मंजूरी नाही. १०९ कोटीचे जकातीचे उद्‌दिष्ठ दिले. त्यात अटी व शर्ती मध्ये बदल केला व ५६ कोटी रूपयाचा अनुभव असावा. त्या निविदाधारकांला एका वर्षाचा जकात वसूलीचा अनुभव असावा. राज्यात १७ महापालिका आहे. पाच ते सहा महापालिकेत जकात खाजगीकरण आतापर्यत झालेले आहे.या महानगरपालिकेच्या उद्‌दिष्ठा पेक्षा कमी उद्‌दिष्ठ असलेल्या महानगरपालिकेचे खाजगीकरण झालेले आहे. याचा अर्थ असा की जो कूणी ठेकेदार असेल तो आताची वसूली करणारा याचांच कूणी मामा भतीजा असेल हे दोघेच ५६ कोटीची वसूली करणारे आहेत. दोनच लोक या निविदा घेवून शकतात. ही अट टाकण्याची गरज का भासली. २.१८ कोटीची जी अट टाकली ती योग्य आहे. जे उद्‌दिष्ठ ठेवलेले आहे ते कमी आहे. शासनाचा जी.आर. नूसार मागच्या वर्षी टेंडर काढले होते. तो नगरपालिकेचा होता असे आता म्हणणे योग्य होणार नाही. नैसर्गीक वाढ ही १५ टक्के असावी. नसता शासन ताशेरे ओढतील. ज्या दोन अटी ठेवलेल्या आहे त्या रद्य कराव्यात.

श्री.अ.रशिद खान : या प्रकरणात कूणी तरी मा.उच्च न्यायालयात गेलेले आहे.मा.उच्च न्यायालयाचा निकाल आलेला आहे त्यावर सर्वोच्च न्यायालयात प्रकरण गेलेले आहे असे असताना या विषयावर चर्चा करता येते का?

मा. महापौर : याच विषयावर मा. न्यायालयात प्रकरण चालू असेल तर चर्चा न योग्य होईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : जो कूणी गेले ते अटी शर्तीच्या विरोधात गेलेले आहे. अटी शर्ती करणे हे न्यायालयाचे काम नाही. काम सभागृहाचे आहे.

श्री.मो.जावेद मो.इसहाक: एक वर्षासाठी जकात वसूलीचे काम चालू आहे. संबंधीत ठेकेदार यानी मोठया प्रमाणात गुंडगीरी केलेली असून स. सदस्यांना सोडले नाही. हा प्रस्ताव रद्य करावा तसेच १०९ कोटीचे उद्‌दिषट कशाच्या अधारे ठेवलेले आहे. सन २०००-०१ मधये १५ टक्के वाढ केलेली होती. सन २००१-०२ मधये १२ टक्के वाढ केली असे सन २००५ पर्यत १२ ते १५ टक्के नैसर्गीक वाढ जकात वसूलीत केलेली होती. १०१ कोटीचे टारगेट होते तर या वर्षी ११५ ते ११७ कोटी चे असावयास पाहिजे.ट्रान्झिस फिस शासनाने मंजूर केली तर ५ कोटीसह १०९ कोटी दिले आहे नसता पाचकोटी कमी होवून टारगेट १०४ कोटीवर येईल. हे योग्य वाटत नाही.

श्री.वसंत नरवडे : जकात खाजगीकरणाचा निर्णय हा एक वर्षासाठी घेतलेलाहोता. पून्हा यावर्षीही निविदा काढलेली आहे. १०१ कोटीचे टारगेट होते आता १०९ कोटीचे दिले ते महानगरपालिकेनेच वसूल केले तर बरे होईल.जकात खाजगीकरण रद्य करावे हा प्रस्तावही रद्य करावा.यामूळे व्यापारी लोक नगरसेवकांचा अर्वाच्च भाषेत पत्र

देतात.रस्त्यावर लटकवतात याबाबतीतही गुन्हा नोंद करावा.आलेल्या पत्राची प्रत आपल्याला देतो त्याची चौकशी व्हावी अशी विनंती करतो.

याच वेळी मा.महापौर डायस समोर अनेक स. सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

श्री.अ.रशिद खॉन : जकातीतून महानगरपालिकेस फायदा असेल तर करणे योग्य आहे. आज प्रश्न जकात वाढवायचा की नाही हा ठराव आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :जकात वसूली आजपर्यत किती झालेली आहे फायदा असेल तर करण्यात यावे.

मा. आयुक्त : जकातीचे मागिल वर्षी १०१.२५ कोटीमध्ये टेंडर देण्यात आले होते..१ मार्च २००६ ते २८ फेब्रुवारी २००७ पर्यत १०१.२५ संबधीत ठेकेदार महानगरपालिकेस समान हप्त्यात एक वर्षात रक्क्म देणार आहे. ५० हप्त्यात संपूर्ण रक्कम मिळावयास पाहिजे. आतापर्यत जी रक्क्म मिळाली ती हप्त्याप्रमाणे १०० टक्के मिळालेली आहे. आतापर्यत ९३.७२ कोटी मिळालेले आहे. दंडाची रक्क्म म्हणून महानगरपालिकेस मिळेल व जकातीची रक्कम ही संबधीत ठेकेदार वसूल करेल. ३४ लक्ष दंड म्हणून महानगरपालिकेस मिळालेला आहे. बीपीएमसी ॲक्ट मध्ये कराच्या बाबतीत जे रूल आहे त्यातील रूलस् नं. ३५ जकात व पथकर त्या बाबत नेमलेल्या अधिकाऱ्याना व कर्मचाऱ्याना आयुक्तांच्या आदेशान्वये वसूल करता येईल किंवा आयुक्तांस योग्य वाटेल तर त्यास स्थायी समितीच्या मान्यतेने जास्तीत जास्त एका वर्षाच्या कालावधीसाठी जकात व पथकर वसूल करण्याचा मक्ता देता येईल. किंवा आयुक्त स्थायी समितीच्या मान्यतेने या प्रयोजनासाठी आयुक्त आपला अभिकर्ता म्हणून नेमेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या आदेशान्वये तद्नूसार अशी जकात व पथकर वसूल करता येईल. यात असे दिले जर आयुक्तांना योग्य वाटत असेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने आपण कूणालाही जकात अभिकर्ता म्हणून वसूलीसाठी नेमू शकतो. हे अधिकार ॲल्टीमेटली स्थायी समितीचे आहे त्यामूळे सर्वसाधारण सभेसमोर तसा प्रस्ताव आणलेला नाही. जकात वसूली संदर्भात महानगरपालिकेसाठी कोणतेही नियम केलेले नाही. नगरपालिकेसाठी केलेले आहे. तेच धोरण महानगरपालिकेसाठी अवलंबू शकतो. त्यात असे दिले की ज्या वर्षी प्रथमत: खाजगीकरण करीत आहात त्या वर्षीच्या वसूलीच्या प्रमाणात २० टक्के रक्कम वाढून पूढील वर्षी जकात खाजगीकरण केले पाहिजे. त्यानंतर प्रत्येक वर्षी १० टक्केने नैसर्गीक वाढ केली पाहिजे असे नियमात आहे. तेच नियम आपण महानगरपालिकेसाठी लावण्यात आलेले आहे. मागिल वर्षी १०१.२५ कोटी चे टेंडर दिले होते. दोन तीन कंपन्या बंद झालेल्या आहेत म्हणून सात आठ कोटी कमी करावे म्हणून मागणी केलेली होती परंतू करारनामा असल्यामूळे ते रद्द केलेले होते. या वर्षी जकातीचे खाजगीकरण करतांना जी रक्कम ठरविणार आहोत त्यासाठी शहराची परीस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. १०१ कोटीचे टेंडर दिले होते. दारूचे काही गोडाऊन शहराच्या आतच असल्यामूळे रॉ मटेरियलवर जकात मिळते. पूर्वीसारखी १ लक्ष मिळत नाही. यामूळे ३.७५ कोटीचे नूकसान होत

आहे. ही वस्तुस्थिती आहे. तसेच गरवारेची एक कंपनी बंद झालेली आहे.दुसरे असे की एक कंपनी दुसरीकडे शिफ्ट झालेली आहे. तसेच एक ठराव घेतला की १ मार्च पासून पूस्तकावर जकात घेणार नाही. त्यामूळे ५५ लक्षने कमी होत आहे. त्यामूळे १०१ कोटीतून वजा करून ९३ कोटी येते त्यात १० टक्केची वाढ करून १०३ कोटी येते. १० टक्के हे नगरपालिकेसाठी वाढ करावी म्हणून आहे.

डॉ. आशा बिनवडे : उद्दिष्ठ ठरविण्याचा अधिकार त्या नियमाप्रमाणे आयुक्तांना आहे का ?

मा. आयुक्त : जी.आर.महानगरपालिकेसाठी लागू नाही परंतू उद्दिष्ठ ठरवितांना त्यात म्हटले आहे की प्रथम वर्षी २० टक्केनी वाढ करावी.जकात वसूली ही खाजगी अभिकर्त्या मार्फत करायची की नाही हे अधिकार आहे.

डॉ. आशा बिनवडे : खाजगी अभिकर्त्या मार्फत वसूली करायची की नाही हा अधिकार आयुक्तांना असला तरी उद्दिष्ठ ठरविण्याचे अधिकार कोणत्या नियमाप्रमाणे आयुक्तांना आहे .

मा. आयुक्त : हे उद्दिष्ठ नाही हा अदांज आहे. या नियमात दिले आहे की आयुक्तांना योग्य वाटत असेल तर खाजगी अभिकर्त्या मार्फत वसूली करू शकते.

श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय: लोकांना त्रास होत आहे. दुकानामध्ये येवून वसूली करीत आहे. हे योग्य नाही.

मा. आयुक्त : जो अंदाज ठरविला आहे त्यानूसार सर्व प्रोसेस पूर्ण होवून स्थायी समितीच्या मान्यतेसाठी येईल. प्रशासनाने अंदाज ठरविलेला आहे उद्दिष्ठ ठरविलेले नाही. अंदाज कूणी काढायचा हे कूठेही लिहिलेले नाही. प्रशासनाने अंदाज काढला प्रोसेस करणार मार्केट मधून जे काही रेट असतील ते समोर येतील. ते स्थायी समितीच्या समोर प्रस्ताव येईल. कमी ठेवले व रिंग झाली असे वाटत असेल तर स्थायी समितीने अमान्य करावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: खाजगीकरणास आमचा विरोध आहे. स्थायी समिती पेक्षा सर्वसाधारण सभा श्रेष्ठ आहे.

मा. आयुक्त : १० टक्केची वाढ करून या वर्षी १०३ ते १०४ कोटीपर्यत अंदाज येतो. तसेच ट्रान्जिस्ट फिस ही ५० रू.ऐवजी १०० रू करून स्थायी समितीच्या मान्यतेने शासनाकडे पाठविलेले आहे. शासनाकडून त्यास मंजूरी येईल अशी अपेक्षा आहे. म्हणून पाच कोटी प्लस केले असे एकूण १०९ कोटी होत आहे. हे टैंडर येईल ते शासनाची यास मंजूरी येईल या अपेक्षेने टैंडर भरणार आहे. शासनाने रद्य केले. पाच कोटी वजा होतील. जर शासनाने दोन महिण्यानंतर मंजूर केले तर दोन महिण्यासाठी कमी होतील. १० महिण्यासाठी पाच कोटीच्या अगेनेस्ट वाढविण्यात येतील. जकातीचे वस्तूवर दर लावण्याचे अधिकार सभागृहाला तसेच त्यानंतर जनतेच्या सुचना व हरकती नंतर शासनाची मंजूरी लागेल. यासाठी हा प्रस्ताव आलेला आहे.

श्री. अ.साजेद अ. सत्तार: जकात खाजगीकरण केल्यास जे जकात विभागातील कर्मचारी २७५ आहे ते इतर वसूलीसाठी दिले जातील व महानगरपालिकेची जास्तीत जास्त वसूली होईल असे प्रशासनाने मत मागच्या वेळी मांडले होते. या कर्मचाऱ्याना दर महिण्याला तीन कोटी रूपये पगार दिला जातो एक वर्षाचे ३६ कोटी होतात.उलट गेल्या वर्षी

पेक्षा या वर्षी झोन मधील वसूली २० टक्केनी कमी झालेली आहे या कर्मचाऱ्याना पगारावर किती खर्च होतो खूलासा करावा.

श्री.सिताराम सूरे : जकात ठेकेदाराच्या लोकांकडून अनेक व्यापाऱ्याना गाडी चालकांना किलन्नरांना मारहाण झालेली आहे. एक वर्षासाठी ठेका दिला होता आता खाजगीकरणाचा त्या एजन्सीला ठेका देण्यात येवू नये दर वाढ करू नये हा प्रस्ताव रद्य करावा माझा त्यास विरोध आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : संस्थेचे हित करण्यासाठी आम्ही सभागृहात आलेलो आहे. जी चूक होते ती निदर्शनास आणून देण्याचे काम या सभागृहाचे आहे. १०९ कोटी बजेट ठेवलेले आहे शहराच्या वस्तूस्थिती त्यांनी सांगितलेली आहे. परंतू या शहराची लोकसंख्या वाढ होत आहे. मार्केट वाढत आहे. मोठमोठया कंपन्या येत आहे. इमारतीचे मोठमोठे मटेरियल जे की वुडन सनमायका येत आहे. निविदा कितीमध्ये अंतीम करायची हा अधिकार प्रशासनाचा आहे प्रशासनाने शिफारस केल्यानंतर स्थायी समितीला ते मान्य करायचे की नाही हा त्या सभागृहाचा अधिकार आहे दुमत नाही. उद्द्दिष्ठ कमी ठेवण्याचा अधिकार मा. आयुक्तांना नव्हता १०९ ऐवजी ११५ कोटी ठेवावयास पाहिजे होते ते कमी करून शहराच्या विकास कामावर परीणाम होवू शकतो.

मा.आयुक्त : प्रशासनाने अंदाज ठरविलेला आहे. या पेक्षाही जास्त येवू शकते. तेवढे स्थायी समितीकडे पाठविले जाईल.मान्य केले तर खाजगीकरण केले जाईल नसता नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे : सर्वसाधारण व्यक्ती हे टेंडर भरणार नाही. सभागृहाची भावना लक्षात घ्यावी. खाजगीरण करणे गरजेचे आहे परंतू कमी उद्दिष्ठ ठेवू नये. संबधीत व्यक्ती ११५ कोटी न भरता तीन कोटीची रिंग करेल.टेंडर जास्त भरणार नाही.हे समोर दिसते.

श्री.किशनचंद तणवानी :स्थायी समितीकडे तो प्रस्ताव जाईल. मंजूर झाला तर चर्चा करून काही अर्थ नाही.

मा. महापौर : २८.११.२००५ चा निर्णय वाचून दाखवित आहे. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या निर्णयानूसार असे दिले की जकात दर विचारात घेवून जकात कराची वसूली खाजगी अभिकर्त्या मार्फत वसूल करण्यास मंजूरी देण्यात येते कूठेही एक वर्षाचा उल्लेख नाही.हा विषय स्थगित ठेवून यावर विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करून निर्णय घेण्यात येईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येवून यावर विशेष सर्वसाधारण सभा आयोजीत करून निर्णय घेण्यात येईल, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६८९/३ :**

मा.कार्यकारी अभियंता (ड्रे व वि) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग १० अंतर्गत विविध ठिकाणच्या गटारीची दुरूस्ती व ढापे टाकणेच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,२४,७१३/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामाकरिता अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये कामनिहाय तरतुद उपलब्ध नाही करीता सदरील कामाकरिता प्रभाग क्रमांक १०, साठी २००६-२००७ मध्ये वार्ड अ नविन कामे

लेखाशिर्षक :  ०१. खुल्या गटारी संरक्षित भिंत (स्लम) पा.क्र.डब्ल्यु. ७९ अ.क्र.०२ तरतूद ०.७५ लक्ष
०२. जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती पा.क्र.डब्ल्यु ९१ अ.क्र.४० तरतूद २.५० लक्ष

वरील दोन लेखाशिर्षकांचे एकत्रित करण करून सदरील काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

करीता वरीलप्रमाणे एकत्रितकरणांसह कामाचे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग १० अंतर्गत विविध ठिकाणच्या गटारीची दुरूस्ती व ढापे टाकणेच्या कामाचे रक्कम रूपये ३,२४,७१३/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरील कामाकरिता प्रभाग क्रमांक १०, साठी २००६-२००७ मध्ये वार्ड अ नविन कामे.....

लेखाशिर्षक :  ०१. खुल्या गटारी संरक्षित भिंत (स्लम) पा.क्र.डब्ल्यु. ७९ अ.क्र.०२ तरतूद ०.७५ लक्ष
०२. जलनि:सारण देखभाल व दुरूस्ती पा.क्र.डब्ल्यु ९१ अ.क्र.४० तरतूद २.५० लक्ष

या दोन लेखाशिर्षकांचे एकत्रिकरण करून सदरील काम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९०/४ :**

मा.कार्यकारी अभियंता (ड्रे व वि) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग ०१ हर्सूल येथे विविध ठिकाणी जुनी आर सी सी लाईन काढून नविन एस.डब्ल्यु.जी. लाईन टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,००,०००/- चे तयार करण्यात आले असून सदरील कामाकरीता अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये कामनिहाय तरतूद उपलब्ध नाही करीता सदरील कामाकरीता प्रभाग क्रमांक ०१, साठी २००६-२००७ मध्ये वार्ड अ नविन कामे

लेखाशिर्षक : १.पाणी पुरवठा व जलनि:सारण कामे (स्लम) पा.क्र.डब्ल्यु ७९ अ.क्र.०१ तरतूद ०.५० लक्ष
२.भांडवली कामे जलनि:सारण पा.क्र.डब्ल्यु ८२ अ.क्र.०६ तरतूद १.५० लक्ष

वरील दोन लेखाशिर्षकांचे एकत्रित करण करून सदरील काम प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

करिता वरील प्रमाणे एकत्रितकरणांसह कामाचे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग ०१ हर्सूल येथे विविध ठिकाणी जुनी आर सी सी लाईन काढून नविन एस.डब्ल्यु.जी.लाईन टाकण्याच्या कामाचे रक्कम रूपये २,००,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. सदरील कामाकरीता प्रभाग क्रमांक ०१, साठी अर्थसंकल्प २००६-२००७ मध्ये वार्ड **अ** नविन कामे........

लेखाशिर्षक : १.पाणी पुरवठा व जलनि:सारण कामे (स्लम) पा.क्र.डब्ल्यु ७९ अ.क्र.०१ तरतूद ०.५० लक्ष
२.भांडवली कामे जलनि:सारण पा.क्र.डब्ल्यु ८२ अ.क्र.०६ तरतूद १.५० लक्ष

या दोन लेखाशिर्षकांचे एकत्रिकरण करून सदरील काम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९१/५ :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, जाधववाडी येथे वाहतुकनगर विकसीत करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती कडून महानगरपालिकेस दहा एकर जागा १९९८ साली मिळण्यास मंजुरी प्राप्त आहे. सदरहु वाहतुकनगर विकसित करणे निकडीचे आहे. सदर वाहतुकनगर विकासादृष्टीने मुलभुत

गरजेच्या दृष्टीने वाहतुकनगरसाठी पोच रस्ता बांधणी करणे प्राथमिकदृष्ट्या आवश्यक आहे. वाहतुकनगरसाठी पोच रस्ता असलेला जाधववाडी येथील ३६.० मी.रूंद वि.यो.रस्ता अद्यापपर्यंत भूसंपादन कार्यवाही पूर्ण न झाल्याने रस्ता बांधणी हाती घेणे प्रत्यक्षात संभवत नाही, वरील बाब विचारात घेता व वाहतुकनगर विकसित करण्याचे सार्वजनिक प्रयोजनादृष्टीने वाहतुकनगरसाठीचा पोच रस्ता जाधववाडी संकुलातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे नियोजित आखणीनुसार महानगरपालिकेचे खर्चाने बांधुन घेणेची धोरणात्मक बाब मा.सार्वजनिक सभागृहासमोर ठेवण्यास निर्देशित आहे.

सदरहु कृषी उत्पन्न बाजार समितीचे नियोजित आखणीप्रमाणे महानगरपालिकेचे खर्चाने बांधावयाचे ५०० मी. लांबीचा पोच रस्ता अस्तित्वातील आझाद संकुलपासून पूर्वेकडील वाहतुकनगर पर्यंत बांधावा लागणार आहे. सदर ५०० मी.लांब व दोन पदरी रस्ता रूंदी आणि रस्त्यातील नळकांडी पुल बांधणी यासाठी एकत्रित ढोबळ अंदाजपत्रकाची किमंत रू.३० (तीस) लक्ष एवढी आहे. सदर रस्ता बांधणीसाठीचा खर्च मा.सर्वसाधारण सभागृहाचे दि.१९.०६.२००६ रोजीचे बैठकीतील विषय क्र.२७४/२ अनुसार वाहतुक नगर विकासासाठीचे रू.२०० लक्ष मंजुर निधीतून प्रस्तावित आहे.

तरी प्रकरणी उक्त नमुदप्रमाणे वाहतुकनगर पोच रस्ता बांधणीचे व महानगरपालिकाकडून रस्ता बांधणी खर्चास धोरणात्मक निर्णयास्तव प्रस्तावित प्रमाणे मा.सर्वसाधारण सभागृहाचे विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट : जे अंदाजपत्रकाचे विषय आहे त्यास मान्यता दयावी.

श्री.सिताराम सूरे : ५०० मी.लांबीचा ३० लक्ष रू. खर्च करून रस्ता करणार आहोत. जाधववाडी येथील विशिष्ट संस्थेकरीता खर्च न करता तो रस्ता बाजूच्या कॉलनीत करावा जनतेसाठी व ज्या ट्रान्सपोर्टच्या गाड्या जातील त्यांचेसाठीही उपयोगात येईल.

मा. महापौर : आपला विरोध नोंदवून मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,जाधववाडी येथे वाहतुकनगरसाठी ५०० मी.लांब व दोन पदरी रस्ता रूंदी आणि रस्त्यातील नळकांडी पुल बांधणी यासाठी एकत्रित ढोबळ किमंत रू.३०.०० लक्षच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच सदर रस्ता बांधणीसाठीचा खर्च मा.सर्वसाधारण सभागृहाचे दि.१९.०६.२००६ रोजीचे बैठकीतील विषय क्र.२७४/२ अनुसार वाहतुक नगर विकासासाठीचे रू.२०० लक्ष मंजुर निधीतून करणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९२/६ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका हातगाडी,फेरीवाले यांना परवाना देण्यासाठी व फी वसूली करण्यासाठी सदरचे काम ठेकेदाराकडून करून घेणे प्रस्तावित आहे. महानगरपालिकेने शहरातील प्रमुख रस्त्यावरील अतिक्रमणे मोठ्या प्रमाणावर हटविण्याची कार्यवाही केली असल्यामूळे व साध्या सुध्या सदर कार्यवाही सुरू असल्यामूळे छोटे व्यावसायीकांनी शहरामध्ये त्यांचा व्यवसाय करणे सुलभ व्हावे यासाठी हातगाडी धारकांना व फेरीवाल्यांना परवाने देणे प्रस्तावित आहे. यापूर्वी सर्वसाधारण सभेने विषय क्र.२८७/७ दि.११.०८.२००६ रोजी या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. तथापि प्रस्ताव मंजुर करतांना मा.सर्वसाधारण सभेने दिलेल्या आदेशानुसार सुधारीत नियमावली तयार करून सर्वसाधारण सभेचे मंजुरी घेण्याचे सुचित केल्याप्रमाणे सुधारीत नियमावली व अटी शर्ती यासोबत जोडण्यात येत आहे. तरी सुधारीत अटी शर्ती व नियमावली मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**सोबत : नियमावली**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८६ व ३८६ (२) अन्वये.**

विषय :- औरंगाबाद शहरात फिरणाऱ्या हातगाड्या व टपऱ्यांना परवानगी देणे बाबत नियमावली.

संदर्भ :- मा.सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्देशान्वये ठराव क्र.२८७/७, दि.११.०८.०६

**नियमावली (शहरात फिरणाऱ्या हातगाड्या बाबत)**

वरील विषयी व संदर्भान्वये मा.आयुक्त यांचेकडे झालेल्या बैठकीत उपआयुक्त (महसूल), सहाय्यक आयुक्त, संचालक नगर रचना, प्रशासकीय अधिकारी, मालमत्ता अधिकारी, विधी सल्लागार हे उपस्थित होते. त्यावेळी मा.आयुक्त यांनी हातगाडी व टपऱ्या बाबत मार्गदर्शन केले, त्यात प्रामुख्याने शहरातील हातगाड्या व टपऱ्यामूळे होणारे अतिक्रमणावर अंकुश ठेवणे हा प्रमुख उद्देश होता.

मा.आयुक्तांनी हातगाडी बाबत खालील प्रमाणे धोरण ठरविण्याचे निर्देश दिले.

०१. हातगाडी २४ मी. रूंद रस्त्यासह पुढील रूंद रस्त्यास अनुज्ञेय होणार नाही.

०२. औरंगाबाद शहरातील मुख्य चौकापासून १०० मी.च्या आता येण्यास मज्जाव राहील.

०३. हातगाडीसाठी आवश्यक ते लायसन्स महानगरपालिकेतर्फे घ्यावे लागेल.

०४. लायसन्स दर ११ महीन्यांनी नुतणीकरण करून घ्यावे लागेल.

०५. मुद्रांक शुल्क रू.१००/- च्या पेपरवर शपथपत्र द्यावे लागेल.

०६. हातगाडी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या क्षेत्रामध्येच फिरवावी लागेल.

०७. हातगाडी विशिष्ट एका ठिकाणी उभी करू नये, ती सतत फिरती राहील.

०८. वाहतुकीस अडथळा होईल अशा ठिकाणी हातगाडी उभी करता येणार नाही.

०९. हातगाडी पुढील वर्षाच्या परवाना नुतणीकरणासाठी आवश्यक तसा अर्ज परवानगी फी सह परवाना दिनांकाच्या एक महिना अगोदर करणे आवश्यक आहे.

१०. चारचाकी गाडी बरोबर आपणांस कचरा टोपली ही (Dust Bin) सोबत ठेवावी लागेल अन्यथा परवाना रद्द समजण्यात येवून गाडी जप्त करण्यात येईल.

११. परवाना घेण्यासाठी अर्जदारास विशिष्ट नमुन्यामध्ये अर्ज करावा लागेल. अर्जा सोबत अर्जदारांचा संपूर्ण पत्ता नावांसह व पुराव्या करीता मालमत्ता कराची पावती, रेशन कार्ड, निवडणूक कार्ड, वीजबील, दोन पासपोर्ट साईज फोटो आवश्यक राहतील.

१२. कार्यालयाने ठरवून दिलेले दर प्रत्येकी शुल्क रू.३६५/- प्रतीवर्ष, आस्थापना खर्चासह भरावे लागेल.

१३. संसर्गजन्य रोग व घाण यापासून बचाव करणेसाठी गोड पदार्थ असल्यास त्यावर जाळी ठेवावी व चहाची घाण रस्त्यात न टाकता ती एकत्र करून त्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधित हातगाडीवाल्यांची राहील.

१४. परवान्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही पदार्थ ठेवल्यास आपला परवाना रद्द करण्यात येईल.

१५. हातगाडी मुख्य रस्त्यावर फिरल्यास परवाना शुल्काच्या पाचपट दंड आकारण्यात येईल. तसेच विना परवाना हातगाडी रस्त्यावर फिरल्यास दहापट दंड आकारण्यात येईल.

१६. उपरोक्त कोणत्याही अटी शर्तीचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना राहील.

१७. लायसन्ससाठी किंवा परवानगीसाठी करावयाचा अर्ज मा.आयुक्तांना उद्देशुन केला पाहीजे.

१८. आयुक्तांनी किंवा त्यांच्या वतीने लायसन्ससाठी किंवा परवानगीसाठी फी स्विकारली आहे. एवढ्याच कारणावरून फी देणाऱ्या व्यक्तीस लायसन्स किंवा परवानगी मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

१९. या नियमान्वये दिलेले कोणतेही लायसन्स किंवा परवानगी विपर्यस्त माहिती देवून किंवा लबाडीने मिळवलेली आहे, अशी आयुक्तांची खात्री झाली तर असे लायसन्स किंवा परवानगी कोणत्याहीवेळी आयुक्तास निलंबीत करता येईल किंवा रद्द करता येईल.

२०. जेव्हा जेव्हा मा.पोलिस आयुक्त/मनपा आयुक्त निगेटिव्ह (झोन) रस्ते घोषित करील तेंव्हा त्या (झोन) रस्त्यावर हातगाडी परवाना देता येणार नाही.

२१. दुकानदारास त्याच्या दुकानासमोर परवाना देता येणार नाही.

वरील अ.क्र. १ ते २१ अटी शर्ती समाविष्ठ करणे योग्य.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.अ.रशिद खान | : इतक्या अटी शर्ती टाकल्या त्यांनी व्यवसाय करावे कि नाही. |
| श्री.संजय सिरसाट | : गुलमंडी पैठणे गेट असेल या भागात नो हॉकर्स झोन म्हणून जाहीर करावे. जेथे रहदारी जास्त आहे ते बंद करावे. |
| श्री.अ.रशिद खान | : दुरूस्ती करून मान्यता दयावी. |
| मा. आयुक्त | : एक एक अटी आपण वाचाव्या आजच मान्य करावे कारण बऱ्याच दिवसापूर्वी लोकांच्या टपऱ्या हातगाडी काढलेल्या आहे ते घरी आहेत. त्यांना हातगाडीचे परवाना देणे गरजेचे आहे. |
| श्री.तणवाणी किशनचंद | : सिटीचौक ते गुलमंडी पैठण गेट ते महात्मा जोतिबा फुले चौक पर्यत नो होकर झोन म्हणून मंजूर करावे. गुलमंडीचे जे आतले रस्ते आहे तेथे हातगाड्यासाठी परवाना देण्यात यावा. |
| मा.महापौर | : स.सदस्यांच्या ज्या सूचना येतील,त्यानूसार प्रशासनाने विचार करून दुरूस्ती करावी, मंजूरी देण्यात येते. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हातगाडी,फेरीवाले यांना परवाना देण्यासाठी व फी वसूली करण्यासाठी सदरचे काम ठेकेदाराकडून करून घेणेच्या यापूर्वी सर्वसाधारण सभेने विषय क्र.२८७/७ दि.११.०८.२००६ रोजी या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. तथापि प्रस्ताव मंजुर करतांना मा.सर्वसाधारण सभेने दिलेल्या आदेशानुसार प्रस्तुत प्रस्तावातील सुधारीत नियमावली व अ.क्र. १ ते २१ अटी शर्तीस मंजुरी देण्यांत येते. तसेच स.सदस्यांच्या ज्या सूचना येतील,त्यानूसार प्रशासनाने विचार करून अटी व शर्तीमध्ये दुरूस्ती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९३/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.सर्वसाधारण सभा दिनांक १८.०२.२००६ विषय क्र.२०२/७ अन्वये सिडको अधिसूचित क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे दिनांक ०१.०४.२००६ पासून हस्तांतरण झाल्याने जलनि:सारण व्यवस्थे अंतर्गत देखभाल व दुरूस्तीचे कामे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे करणे, त्या सोबतच इतर सुविधा पुरविणे करीता निविदा बोलविणेसाठी मंजुरीसाठी प्राप्त आहे.

मा.सर्वसाधारण सभेच्या उपरोक्त मंजुरीनुसार दिनांक ०३.०३.२००६ रोजी मलनि:सारण व्यवस्था देखभाल करणेच्या कामांच्या वेगवेगळ्या सात निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. दिनांक ०१.०४.२००६ पासून देखभाल करण्याची कामे प्रगतीपथावर आहे. या कामांचा खर्च भागविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक २५.०९.२००६ रोजी विषय क्र.४२२/०८ अन्वये रक्कम रूपये १४.७५ लक्ष

उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर तरतूद लेखाशिर्ष सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट विकसीत करणेसाठी अर्थसंकल्प २००६-०७ मध्ये उपलब्ध असलेला तरतूदीमधून वळती करून देण्यात आलेली आहे. ३१ मार्च २००७ पर्यंत देखभालीची कामे करण्यासाठी वाढीव रक्कम रूपये ४.५० लक्ष अपेक्षीत आहे. सदर वाढीव रक्कम रू.४.५० लक्ष सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट विकसीत करण्यासाठी अर्थसंकल्प २००६-२००७ पान क्र.एन-६१ अ.क्र.०५ नुसार उपलब्ध असलेल्या र.रू.१ कोटी मधून वळती करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान : विषय क्र ७ वर खूलासा करावा.

कार्य.अभियंता(विद्यु.ड्रे.) :सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाले तेंव्हा ज्या ड्रेनेज लाईन आहे त्याची देखभाल दुरूस्तीचे कामासाठी खाजगी एजन्सी नियुक्त केलेल्या आहेत. ११ एजन्सी आहे. सिडकोच्या अधारावर अंदाजपत्रक केले होते वेळ कमी होता. लहान लहान कामे आहेत.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: पूढील बजेट मध्ये घ्यावे.

श्री.संतोष खेंडके : झाल्टा येथे प्लॅन्ट चालू आहे तो केंव्हा सूरू होणार आहे.

अति.शहर अभियंता : तेथील काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे. एमएसईबीचे कनेक्शन दयायचे आहे. नारेगाव येथील मुख्य सिव्हर लाईन व एसटीपीचे अंतर ५० ते ६० मी. येतो. ते वाढवून काम करण्याचे बाकी आहे नंतर सूरू केले जाईल.

मा. महापौर : मंजूरी देण्यात येते.

श्री. काशिनाथ कोकाटे : कामाची जी वेळ होती तो वेळ संपलेला आहे. सिडको एन २ मध्ये जो ट्रिटमेन्ट प्लॅन्ट होता तेथे मोठी वसाहत आहे. तो चालू केला नाही तर धोका निर्माण होवू शकतो तो चालू करण्यास अडचण नाही. याचे अंदाजपत्रक कोणत्या स्तरावर आहे पाहणी काय केलेली आहे. तात्काळ केले नाही. तर प्रदुषण वाढणार आहे याचा त्रास जनतेला होणार आहे.

कार्य. अभियंता ड्रेनेज :हा प्लॅन्ट हा अति. शहर अभियंता यांचेकडून झालेले आहे. मयूरपार्क पासून मेन सिव्हर येते ती झाल्टा पर्यत आहे. १०,१२ वर्षापूर्वीचे ते काम झालेले असून अनेक ठिकाणी लोकांनी डॅमेज केलेली आसून त्यावर घरे झालेली आहे. आज रोजी संपूर्ण पाणी हे नाल्यातून वाहते..संपूर्ण लाईनचा सर्वे केला डिजाईन काढले आहे. सर्व प्रोसेस पूर्ण करून १ ते १.२५ कोटीपर्यत त्यासाठी बजेट लागणार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : १० ते १२ वर्षापूर्वी दोन कोटी खर्च केले आजरोजी नागरीकांना काहीही उपयोग होत नाही. तीच लाईन खराब झाली म्हणून पून्हा काढण्याची वेळ आली. यावर मा. आयुक्तांचे काय मत आहे. हा खर्च व्यर्थ गेला काय खूलासा घ्यावा.अनेक योजना आहे की करोडो रूपये खर्च केले त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे.२५ हजार रू. चे कामाचे संचिका रिजेक्ट होतात हे योग्य नाही.

मा. महापौर : या संबधी पूढील बैठकीत अहवाल सभागृहात देण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे : लाईन टाकल्यानंतर सूध्दा पाणी व्यवस्थित रित्या जावू शकत नाही. मा. आयुक्त मा. महापौर उपमहापौर यांनी या ठिकाणी व्हिजीट दयावी.

मा. महापौर : ठिक आहे पाहणी करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको अधिसूचित क्षेत्रातील जलनि:सारण व्यवस्थे अंतर्गत देखभाल व दुरूस्तीचे वाढीव कामासाठी रक्कम रूपये ४.५० लक्ष सिव्हरेज ट्रिटमेंट प्लांट विकसीत करण्यासाठी अर्थसंकल्प २००६-२००७ पान क्र.एन-६१ अ.क्र.०५ नुसार उपलब्ध असलेल्या र.रू.१ कोटी मधून वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९४/८ :**

(सर्वसाधारण सभा दि.२५.०९.२००६(दि.२०.०९.०६ ची तहकूब)ठराव क्र.४२५/११अन्वये पुन्हः ठेवण्यांत येत आहे)

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिका कार्यक्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावली शासन, नगर विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक टि.पी.एस.- ३०८८/४५४/सी.आर.-५९/ नवि-१२ दिनांक १४ ऑक्टोबर, १९९१ नूसार मंजूर असून त्यात वेळोवेळी आवश्यक ते बदल भागश: करण्यात आले आहे,

शासन, नगर विकास विभाग यांचेकडील आदेश पत्र क्रमांक टि.पी.एस- ३००५/९८९/प्र. क्र.१९४/२००५/नवि-३० दिनांक १५ एप्रिल,२००६ अन्वये ''ना विकास विभागात पेट्रोप पंप / गॅस फिलिंग स्टेशन अनुज्ञेय करणे बाबतची तरतूद औरंगाबाद महानगरपालिकेसाठीच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणे बाबत'' महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम -३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहे,

**'' निर्देश ''**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास योजनेतील ना विकास विभागात पेट्रोलपंप/गॅस फिलिंग स्टेशन खालील अटींवर अनुज्ञेय करण्याची तरतूद औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

अट क्र. १) प्रस्तावित भूखंडाचे क्षेत्रफळ किमान २००० चौ. मी. असावे.

२) या भूखंडावर कमाल ०.२ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

३) या भूखंडावर फक्त तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील.

४) प्रस्तापित भूखंड राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८.०० मीटर रूंद रस्त्यावर असावा.

५) केंद्र शासनाच्या पेट्रोलियम विभागाचे तसेच चीफ कंट्रोलर ऑफ एक्स्प्लोझिव्ह यांचे संमतीपत्र आवश्यक राहील.

६) प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. तसेच सेवा रस्ता/इमारत रेषा, नियंत्रण रेषा इत्यादी बाबतीत शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७, दिनांक ९ मार्च,२००१ व त्यानंतरची व संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके बंधनकारक राहतील.

७) केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवेज कडील दिनांक २५ सप्टेबर २००३/ दिनांक १७ ऑक्टोबर, २००३ चे पत्र व त्या सोबतच्या सहपत्रातील सुचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

८) संबंधीत महानगरपालिकेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील पेट्रोलपंप/ गॅस फिलिंग स्टेशन्स करीताचे नियम लागू राहतील.

औरंगाबाद महानगरपालिकेने त्यांचे कार्यक्षेत्रासाठी मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रमांक 14.2 अंतर्गतच्या Appendix M मधील नियम क्रमांक M- 7.1 मधील अनुक्रमांक (Xiii) नंतर अनुक्रमांक- (xiv) Petrol Pump/Gas Filling Station चा नव्याने खालीलप्रमाणे समावेश करण्याचे प्रस्तापित आहे.

**Appendix –M-**

**7.1 (xiv) Petrol Pump/Gas Filling Station Shall be allowed in the No Development Zone (Green Zone) Subject to the following condition**

a) The minimum area of the proposed plot should be 2000 sq. mt.
b) The maximum FSI allowed on thhe plot shall be 0.2
c) Constructtion of only Ground Floor shall be allowed on the plot.
d) The proposed plot shall abut to the Road having width not less thah 18.00 m. and to National High way,State High way,Major District Road and 18.0 m. wide Road.
e) The Concent letter of Petrolium Department of the Central Government as well as of the Chief controller of the Explosive are necessary.
f) As per the existing rules the No objection certificate from public works Departments and other related Department is necessary. Government Resolution, Public Works Departemnt. No RBD- 1081/871/ Road-7 Dated 9 march, 2001 and subseqent Circulers in this regard issued time to time in case of Service Road/ Building line, Control Line.etc. are also binding.
g) The instruction given in the Letters and in the annexures enclosed to it dated 25 september, 2003/ Dated 17 October, 2003 from the Central Ministry of Road Transport and Highways shall be binding to follow.
h) The prevailing rules in the Sanctioned Devlopment Control Rules of the Municipal Corporation of Aurangabad about Petrol Pump/Gas filling Station are also applicable.

वरीलप्रमाणे शासन मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम१९६६ चे कलम-३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. करीता प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम३७ची कार्यवाही करण्यास मान्यता व्हावी व वरील प्रमाणे प्रस्तावास मान्यता झाल्यानंतर उक्त अधिनियमाचे कलम३७ अन्वये पुढील कार्यवाही करण्याचे व शासनास प्रस्ताव सादर करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना देणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा. महापौर | : अशी किती प्रकरणे आहे की नो डेव्हलपमेंन्ट झोन मध्ये येतात. |
| सहा. संचालक न. र. | :गॅस फिलींग स्टेशनचा एकच प्रस्ताव आला होता. तो रिजेक्ट केलेला आहे. |
| श्री.सय्यद खुसरो | :सभागृहाची दिशाभूल करू नये या बाबतीचा माझ्याकडे जी. आर आहे. |
| श्री.संतोष खेडके | :हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवावा.हा प्रस्ताव समजलेला नाही. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | : या शहरात पेट्रोल पंप नाही का स्थगिती का दयायची महानगरपालिकेच्या उत्पन्नात लॉस होणार आहे काय. |
| मा.महापौर | : हा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.पूढील बैठकीत यावर निर्णय घेतला जाईल. |

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येवून पुढील बैठकीत यावर निर्णय घेतला जाईल, असे ठरले.

**विषय क्र. ६९५/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील सर्व अधिकृत/अनाधिकृत व व्यवसायीक नळ जोडणीची तपासणी करून अनाधिकृत, व्यवसायिक नळ अधिकृत करून सर्व व्यवसायीक नळ जोडण्यांना जलमापक यंत्र बसवून पाणीपट्टीची वसूली महानगरपालिका दरानुसार करणे या कामासाठी खाजगी अभिकर्त्याकडून Turn Key पध्दतीवर निविदा मागविण्याचे नियोजन आहे.

**अ. अधिकृत नळ जोडण्या**

✲ आज रोजी शहरात अधिकृत व्यवसायीक नळ जोडणी संख्या - ९१६

✲ अधिकृत नळ जोडणीद्वारे अपेक्षीत वार्षीक उत्पन्न - रू.१५२.५९ लक्ष

नळ जोडणीची व्यासनिहाय संख्या व उत्पन्न खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | व्यास (इंच) | संख्या | पाणी पट्टी दर | अपेक्षीत उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| ०१ | १/२ | ५७४ | ६५०० | ३७.३१ लक्ष |
| ०२ | ३/४ | १५४ | १२००० | १९.६८ लक्ष |
| ०३ | १ | १४४ | २५००० | ३६.०० लक्ष |
| ०४ | १ १/२ | १८ | ७०००० | १२.६० लक्ष |
| ०५ | २ | १५ | १४०००० | २१.०० लक्ष |
| ०६ | ३ | ०३ | २००००० | ६.०० लक्ष |
| ०७ | ४ | ०६ | ३००००० | १८.०० लक्ष |
| ०८ | ६ | ०२ | ४००००० | ८.०० लक्ष |
| | **एकूण** | **९१६** | | **१५२.५९ लक्ष** |

**ब. अनाधिकृत नळ जोडण्या**

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागातर्फे नोंदविलेल्या अधिकृत व्यवसायीक नळांव्यतिरिक्त शहरात १२३३ व्यवसायीक अनाधिकृत नळ जोडण्या असाव्यात असा आरोग्य विभाग व अग्नीशमन विभागाकडे नोंदविलेल्या उद्योगधंद्याची यादी पाहता अंदाज करता येतो.

या १२३३ व्यवसायीक नळ धारकांकडून आज रोजी महानगरपालिकेस कूठलेही उत्पन्न मिळत नाही. उपरोक्त १२३३ नळ कनेक्शन अभय योजने अंतर्गत अधिकृत केल्यास मनपास खालील प्रमाणे उत्पन्न अपेक्षीत आहे.

मनपा अभय योजने अंतर्गत व्यास निहाय रक्कम

| अ.क्र. | व्यास | दंड | रस्ता दुरूस्ती | चालू वर्षाची पाणी पट्टी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५ मीमी / १/२ इंच | ४०००/- | २००/- | ६५००/- | १०७००/- |
| २ | २० मीमी/ ३/४ इंच | ५०००/- | २००/- | १२०००/- | १७२००/- |
| ३ | २५ मीमी / १ इंच | ६०००/- | २००/- | २५०००/- | ३१२००/- |

उपरोक्त दरांना मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.३५२/३ दिनांक १९.०६.२००४ रोजी मंजुरी प्रदान केलेली आहे.

वरील दरांनुसार विचार करता मनपास १२३३ अनाधिकृत नळांद्वारे खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षीत आहे.

| अ.क्र. | व्यास | नळ संख्या (अंदाजे) | दर | उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | १५ मीमी | ७४० | १०७००/- | ८९.१८ लक्ष |
| २ | २० मीमी | ३७० | १७२००/- | ६३.६४ लक्ष |
| ३ | २५ मीमी | १२३ | ३१२००/- | ३८.३८ लक्ष |
| | | | | **एकूण –१८१.२० लक्ष** |

म्हणजेच अधिकृत नळांची पाणीपट्टी व अनाधिकृत नळ अधिकृत करणे यामूळे मनपास एकूण १५२.५९+१८१.२० = ३३३.७९ लक्ष म्हणजेच रू.३३४ लक्ष इतके उत्पन्न मिळू शकते.

याकामाकरीता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यासाठी निविदा मागवून स्पर्धात्मक दर मागविणे योग्य राहील.मनपाने ठरवून दिलेल्या उत्पन्नापेक्षा म्हणजेच रूपये३३४.००लक्षपेक्षा जास्तदराची (उत्पन्नाची) निविदा दाखल करणाऱ्या अभिकर्त्यास खालील अटी व शर्तीनुसार काम करणे बंधनकारक राहील.

**भाग– अ:– सर्व्हेक्षण करून नळ नियमीत करणे.**

१. खाजगी सर्व्हेक्षकाने शहरातील सर्व व्यवसायीक नळ जोडण्यात तपासाव्यात.

२. नळ धारकास नळाचे कागदपत्र सादर करण्याबाबतची नोटीस द्यावी. नोटीस देण्याबाबतचा अधिकार संबंधीतास देण्यांत येईल.

३. नोटीसची मुदत संपल्यानंतर अधिकृत व अनधिकृत अशी वर्गवारी करावी.

४. अनधिकृत नळधारकाकडून महानगरपालिकेने अभय योजने अंतर्गत ठरवून दिलेल्या रक्कमेनुसार पैसे वसूल करावेत व संबंधीतास त्याबाबतची रितसर पावती द्यावी.

५. खाजगी अभिकर्त्याने दर भरलेली रक्कम ही १२ समान हप्त्यात प्रत्येक महिन्याच्या तीन तारखेपर्यंत महानगरपालिका कार्यालयात जमा करणे व त्याबाबत कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांना अवगत करणे बंधनकारक राहील.

६. सर्वेक्षणासाठी लागणाऱ्या प्रपत्राचा मसूदा/पावती पुस्तके/नोटीस इत्यादी पाणी पुरवठा विभागाकडून मंजूर करून घ्यावे लागेल. मसुदा मान्यतेनंतर त्यात कुठलाही बदल पाणी पुरवठा विभागाच्या संमतीशिवाय करता येणार नाही.

७. सर्व्हेक्षणासाठी लागणारा सर्व खर्च अभिकर्त्यास करावा लागेल.

८. सर्व्हेक्षण करणाऱ्या संस्थेस सर्व्हेक्षणासाठी लागणारे कर्मचारी स्वखर्चानेनेमावे लागतील. तसेच करार संपुष्टात आल्यावर हे कर्मचारी महानगरपालिकेत नोकरीबाबत हक्क सांगणार नाही याबाबत रूपये १००/- च्या मुद्रांकावर हमी पत्र द्यावे लागेल.

९. सर्व्हेक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी महानगरपालिकेस ओळखपत्रासह द्यावी लागेल तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यांने सर्व्हेक्षण करतेवेळी ओळखपत्र वापरणे बंधनकारक राहील.

१०. अनाधिकृत नळ सर्व्हेक्षण करतांना एखाद्या नळधारकाने नळ अधिकृत करण्यास नकार दिला तर त्या नळधारकाचे नळ कनेक्शन खंडीत करणे व संबंधीतावर पोलीस कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांचेकडे सादर करणे बंधनकारक राहील.

**भाग–ब मिटर बसविणे**

११. अभिकर्त्याने अधिकृत केलेल्या नळांना व्यासनिहाय ISI प्रमाणित पाण्याचे मिटर बसविणे बंधनकारक राहील. मिटरबसविण्याचा दर वउत्पादीत कंपनी महानगरपालिका ठरवील. बसविलेल्या मिटरची रक्कम ही महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार नळधारकांकडून १२ समान हप्त्यात वसूल करण्याची जबाबदारी अभिकर्त्यांची राहील.

१२. करार संपुष्टात आल्यावर मिटर सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिका कर्मचाऱ्यांसोबत पाहणी करून द्यावे लागेल.

**भाग–क अधिकृत नळांना मिटर बसविणे व पाणी पट्‌टी वसूली करणे.**

१३. महानगरपालिकेकडे नोंदणी असलेल्या अधिकृत नळांना व्यासनिहाय ISI प्रमाणीत पाण्याचे मिटर बसविणे बंधनकारक राहील. मिटर बसविण्याचा दर व उत्पादीत कंपनी महानगरपालिका ठरवील. बसविलेल्या मिटरची रक्कम ही महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या दरानुसार नळधारकांकडून १२ समान हप्त्यात वसूल करण्याची जबाबदारी अभिकर्त्याची राहील.

१४. अधिकृत नळांना बसविलेल्या मिटरची रिडींग ही सर्व्हेक्षकास प्रत्येक महिण्यास घेवून महानगरपालिकेच्या दरानुसार पाणी देयक देण्याची व पाणीपट्‌टी वसूल करण्याची जबाबदारी सर्व्हेक्षकावर राहील.

१५. सर्व्हेक्षणाबाबत,मिटर बसविणे,रिडींग घेणे,वसूली करणे याबाबत आयुक्त,महानगरपालिका यांचे निर्णय अंतिम राहतील.

१६. अधिकृत नळांची पाणी पट्‌टी वसूली ही कार्यादेश दिलेल्या दिनांकापासून पुढील वित्तीय वर्षाकरीत राहील. मागील थकबाकी ही महानगरपालिका वसूल करेल. थकबाकी वसूल करण्याचा अधिकार अभिकर्त्यास राहणार नाही.

१७. उपरोक्त काम करण्यासाठी कार्यादेशापूर्वी खाजगी सर्व्हेक्षकास अनामत रक्कम म्हणून रूपये २०% महानगरपालिकेकडे बँक गॅरंटीच्या स्वरूपात जमा करावी लागेल.

१८. अधिकृत केलेल्या नळांची तपशीलवार माहिती तसेच पाणीपट्‌टी वसूली बाबत स्वतंत्रपणे नोंदी ठेवण्यात येवून त्याबाबतचा दैनंदिन अहवाल कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा यांना देणे बंधनकारक राहील.

१९. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करतांना कोणतीही कादेशीर अडचण आल्यास आयुक्त,महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहील.

<u>संवाद :</u>

श्री.मधुकर सावंत : हा विषय नामंजूर करण्यात यावा.

मा. महापौर : नामंजूर करण्यात येत आहे.

श्री. भगवान घडमोडे :खाजगी व्यक्तीकडून पाणीपट्‌टी वसूली करण्यास देवू नये.

कार्य. अभियंता(पापू.) : शहरात एकूण ९१६ अधिकृत जोडणे आहे.तसेच अपेक्षीत जोडण्या हया अनधिकृत भागात १२३३ नळ जोडणी असाव्यात असा अंदाज आहे. अधिकृत नळ जोडणीच्या पाईपचा व्यास पाणीपट्‌टी दर तसेच एकूण उत्पन्न १५२ लक्ष आहे. १२३३ नळ कनेक्शन जोडणी यांचे उत्पन्न अपेक्षीत १८१ लक्ष आहे. दोन्ही मिळून ३३४ लक्ष उत्पन्न मिळू शकते. त्याकरीता खाजगी अभिकर्त्यास नियुक्त करून त्याची निविदा काढल्यास ३३४ पेक्षा जास्त निविदा जो भरेल त्याची मान्यता करू त्यास अटी शर्ती सह वसूली करण्यासाठी व अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी अधिकार देण्यात येतील. तसेच मीटर ही बसविण्यात येतील.

श्री.काशिनाथ कोकाटे : चूकीचा प्रस्ताव आलेला आहे. काही भागात पाणी येते काही भागात येत नाही मीटर कसे लावता येईल. जेथे मुबलक पाणी देणार असेल तर मीटर लावणे योग्य

होईल. ई टेडरींग चा राबविण्याचा ठराव पास केला खाजगी अभिकर्त्या मार्फत करणार आहोत.त्या ठिकाणी सॉप्टवेअर इंजिनिअर काम करेल असे दिले होते. ४० -४० कामाचे टेंडर एकाच वेळी वृत्तपत्रात दिले जाते. ३५७ रूपये हे निविदा धारक यांचेकडून वसूल केले जात आहे.त्यामध्ये भ्रष्टाचार होत आहे. खाजगीकरण थांबवावे. पाणीपट्टी वसूली सक्षम करावी. जकातीचे खाजगीकरण केले जे कर्मचारी तेथे होते त्यांना वसूलीसाठी घ्यावे. ज्यांनी पैसे भरणा केले नाही त्यांचे नळ कट करावे.

श्री.अ.साजेद अ. सत्तार : स्थगिती दयावी.

मा. महापौर : हा विषय स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस मंजुरी देण्यांत आली.

मा.महापौर : विषय क्र.१० ते १३ मंजुर करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ६९६/१० :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.विद्यानगर,मौजे गारखेडा या मंजुर रेखाकंनातील भूखंड ज्यांचा न.भू.क्र.१५१८८ ते १५१९४ आहे. त्यांना अधिकृत पोच रस्ता रेखांकनात तसेच जागेवर उपलब्ध नाही. सदर भागाचा नगर भूमापन सर्व्हे झालेला असून, नगर भूमापन कार्यालयाचे अभिलेख शिट क्रमांक ३०७ मध्ये या भूखंडांचे लगत पूर्व बाजूस साधारणत: २.०० मीटर रूंदीची गल्ली दिसून येते, तथापी स्थळावर या गल्लीच्या जागेवर उक्त व लगत भूखंड ज्यांचा न.भू.क्र.१५१८८ ते १५२०१ आहे. या भूखंड धारकांनी कुंपन भिंतीच्या स्वरूपात बहुतांश जागेवर अतिक्रमण केल्याचे दिसून येते.

पोच रस्त्याबाबत विजयनगर व विद्यानगर या दोन्ही बाजूच्या लगत भूखंड धारकाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून आर.सी.ए.क्रमांक-६६०/९२ मधील अपीलात (अपील क्रमांक आर.सी.ए. ३८८/२००५) मा.जिल्हा न्यायालयाने दि.१०.१०.२००६ रोजी मार्गदर्शक निर्देश दिले असून या नुसार विजयनगर रेखाकंनातील भूखंड ज्याचे न.भू.क्र.१५१८७/अ-१ ते १५१८७/अ-७ आहेत. या भूखंडाचे पूर्वेकडील बाजूकडून ४.०० मीटर रूंदीची जागा रस्त्यासाठी घेण्याचे व त्या बदल्यात या भूखंड धारकांना वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व इतर देय आवश्यक सवलती देणे बाबत निर्देश दिले आहेत. असे असले तरी जागेवरील संपूर्ण वस्तुस्थिती आणि विकास नियंत्रण नियमावली नुसार कमीत कमी ६.०० मीटर रूंदीचा रस्ता करणे आवश्यक आहे. उक्त सात भूखंड धारकांनी मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार रस्त्यासाठी ४.०० मीटर रूंदीची जागा देण्याची तयारी दर्शविली आहे. परंतू विद्यानगर रेखाकंनातील भूखंड धारक ज्यांचा न.भू.क्र.१५१८८ ते १५१९४ आहेत ते त्यांचे भूखंडाचे पश्चिम बाजुकडील सामासिक अंतराच्या (४.५० मीटर) जागेतून रस्त्यासाठी २.०० मीटर उर्वरीत रूंदीची जागा देण्यास तयार असल्याचे दिसून येत नाही.

मा.न्यायालयात दोन्ही बाजूचे भूखंड धारकाचे वतीने प्रकरण पोच रस्त्याबाबत मागील काही वर्षापासून न्याय प्रविष्ट आहे. गत २० वर्षापासून विद्यानगर रेखांकनातील उपरोक्त सात भूखंड धारकांचा पोच रस्ता उपलब्ध होण्याबाबतचा प्रश्न प्रलंबित असून मध्यतंरीच्या कालावधीत विजयनगर रेखाकंन महानगरपालिकेकडून स्थगित करण्यात आलेला आहे.

वर नमुद स्थळावरील परिस्थिती, अनेक वर्षा पासूनचे असलेले न्याय प्रविष्ठ प्रकरण व रस्त्याची येथे असलेली आवश्यकता, तसेच विजयनगर रेखाकंनातील भूखंड धारकांनी त्यांचे रेखाकंना वरील

स्थगिती उठवून भूखंडावर बांधकाम परवानगी देणे बाबत सतत मागणी करीत आहेत. दोन्ही रेखांकनातील भूखंड धारक सदर समस्या सांमजस्याने सोडविण्यास तयार असल्याचे दिसून येत नाही. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २०५ नुसार दोन्ही रेखांकनाचे भूखंडाचे दरम्यान कमीत कमी ६.०० मीटर रूंदीचा ना विकास योजना रस्ता (Non Development Plan Road) या ठिकाणी दोन्ही बाजूच्या भूखंडापैकी जागा महानगरपालिकेच्या निधीतून भूसंपादनासाठी प्रत्यक्ष रक्कम खर्च केल्या विना चटई क्षेत्र निर्देशांकाचे (F.S.I.) बदल्यात घेवून रस्ता जागेवर तयार करण्याचा प्रस्ताव पुढील प्रमाणे करण्यात येत आहे.

या प्रस्तावीत रस्त्यासाठी लागणाऱ्या जागेपैकी ४.०० मीटर रूंदीची जागा ही विजयनगर रेखांकनातील भूखंड धारकाकडून आणि उर्वरित २.०० मीटर रूंदीची जागा ही विद्यानगर रेखाकंनातील भूखंड धारकाकडून ज्यांचे न.भू.क्र.१५१८८ ते १५१९४ त्यांचे ४.५० मीटर सामासिक अंतरातून घेणे आणि विद्यानगर मधील या भूखंडाचे पूर्व बाजूस अंदाजे २.०० मीटर गल्ली होती ती विद्यानगर रेखाकंनातील भूखंड धारकांनी आवश्यकतेप्रमाणे समायोजीत करणे. तसेच असे करतांना दोन्ही रेखाकंनातील भूखंड धारकांनी त्यांचे भूखंडाच्या हद्दीवर असलेले तारकूंपण/ कुंपण भिंत स्वखर्चाने मागे सरकवून घेवून त्याचे खर्चाने बांधणे आवश्यक राहील.

करीता विजयनगर व विद्यानगर या दोन रेखाकंनातील उक्त नमुद भूखंडासाठी ६.०० मीटर रूंदीचा ना विकास योजना रस्ता (Non Development Plan Road) तयार करणेसाठीच्या पूढील कार्यवाही साठीचा प्रस्ताव उक्त कलम-२०५ अन्वये मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मो.विद्यानगर,मौजे गारखेडा या मंजुर रेखाकंनातील भूखंड ज्यांचा न.भू.क्र.१५१८८ ते १५१९४ आहे. त्यांना अधिकृत पोच रस्ता रेखांकनात तसेच जागेवर उपलब्ध होत नसल्याने पोच रस्ता उपलब्ध करून देण्या करीता,प्रस्तावीत रस्त्यासाठी लागणाऱ्या जागेपैकी ४.०० मीटर रूंदीची जागा ही विजयनगर रेखांकनातील भूखंड धारकाकडून आणि उर्वरित २.०० मीटर रूंदीची जागा ही विद्यानगर रेखाकंनातील भूखंड धारकाकडून ज्यांचे न.भू.क्र.१५१८८ ते १५१९४ त्यांचे ४.५० मीटर सामासिक अंतरातून घेणे आणि विद्यानगर मधील या भूखंडाचे पूर्व बाजूस अंदाजे २.०० मीटर गल्ली होती ती विद्यानगर रेखाकंनातील भूखंड धारकांनी आवश्यकतेप्रमाणे समायोजीत करणे. तसेच असे करतांना दोन्ही रेखाकंनातील भूखंड धारकांनी त्यांचे भूखंडाच्या हद्दीवर असलेले तारकूंपण/ कुंपण भिंत स्वखर्चाने मागे सरकवून घेण्याच्या अटीवर मा.न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहुन विजयनगर व विद्यानगर या दोन रेखाकंनातील उक्त नमुद भूखंडासाठी ६.०० मीटर रूंदीचा ना विकास योजना रस्ता (Non Development Plan Road) तयार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९७/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ड्रेनेज चोकअप बाबत तसेच ड्रेनेज लाईनमध्ये गाळ/मलबा साठल्या बाबत विविध वार्डातून सतत तक्रारी प्राप्त होतात. संबंधित कर्मचारी व अधिकारी चोकअप काढणेसाठी सतत प्रयत्नशील असतात, परंतु तक्रारींचे निरसन वेळेवर होत नसल्याचे देखिल तक्रारी प्राप्त होतात. ड्रेनेज चोकअप बाबत तक्रार प्राप्त होताच विनाविलंब कार्यवाही करून तक्रारींचे निरसन करण्यासाठी वार्ड (अ) ते (फ) साठी प्रत्येकी एक स्वतंत्र पॉवर बकेट मशीन व रॉडिंग मशीन खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर पॉवर बकेट मशीन व रॉडींग मशीन खरेदी केल्यानंतर शहरातील रस्त्यावरील ड्रेनेज लाईनचे Preventive maintenance करण्यात येईल. जेणे करून रस्ते खोदण्याचे प्रमाण कमी होईल व नागरीकांना अधिक चांगली सेवा मिळेल. तद्वतच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान कमी होईल. याकरीता मशिन खरेदीनंतर नाशिक, पुणे इ. शहरांच्या धर्तीवर औरंगाबाद शहरातही खाजगी एजन्सी मार्फत वर्षभर देखभाल दुरूस्तीचे काम निविदा काढून करण्यात येईल.

प्राप्त दरपत्रकनुसार आधारभूत किमंत विचारात घेवून (पावर बकेट मशीन+पावर रॉडिंग मशीन) एक संच-असे एकूण सहा संचांची अंदाजपत्रक रक्कम रूपये ४०,८८,०००/- होत आहे. सहा पॉवर बकेट मशीन व सहा रॉडिंग मशीन खरेदी करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.४०,८८,०००/- मंजूरीस्तव सादर.

शहरातील मलनि:सारण वाहिन्याचा स्तर वाढविणे, मलनि:सारण प्रक्रिया स्थापित करणे व यंत्र सामुग्री खरेदी करणे करिता सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात पा.क्र.डब्ल्यु-५९ वर उपलब्ध तरतूद रक्कम रूपये ७५ लक्ष मधून प्रस्तुत खरेदी/कामाचा खर्च भागविण्याचे प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ड्रेनेज चोकअप तसेच ड्रेनेज लाईनमध्ये साठलेला गाळ/मलबा काढणेसाठी वार्ड (अ) ते (फ) साठी प्रत्येकी एक स्वतंत्र पॉवर बकेट मशीन व रॉडिंग मशीन खरेदी करण्याचे एक संच-असे एकूण सहा संचांच्या रक्कम रूपये ४०,८८,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते. तसेच शहरातील मलनि:सारण वाहिन्याचा स्तर वाढविणे, मलनि:सारण प्रक्रिया स्थापित करणे व यंत्र सामुग्री खरेदी करणे करिता सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पात पा.क्र.डब्ल्यु-५९ वर उपलब्ध असलेली तरतूद रक्कम रूपये ७५ लक्ष मधून प्रस्तुत खरेदी/कामाचा खर्च भागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९८/१२ :**

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराच्या (सुधारीत) मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ३१९ ''पर्यटक सुविधा केंद्र'' हे प्रस्तावित असून त्याचे भूसंपादन व विकासासाठी ''समुचित प्राधिकरण'' महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, औरंगाबाद असल्याचे दिसून येते. उक्त आरक्षण सर्व्हे क्रमांक १२ न.भू.क्र.२०१५५/ पैकी मौजे केसरसिंगपुरा या जमीनीवर प्रस्तावित असून त्याचे क्षेत्र १.३८ हेक्टर दिसून येते.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, औरंगाबाद या कार्यालयाने त्याच्यासाठी प्रस्तावित उक्त आरक्षणाखालील जमीनीचे भूसंपादन करण्यास नकार दिलेला आहे. उक्त प्राधिकरणाने मंजुर विकास योजनेतील आरक्षणाचे भूसंपादन करण्यास असमर्थता दाखविली असल्याने उक्त आरक्षण व्यपगत होईल.

औरंगाबाद शहराचा जलदगतीने होणारा विकास आणि औरंगाबाद शहराचा पर्यटन क्षेत्रात असलेली जागतीक प्रसिध्दी यांचा विचार होवून उक्त आरक्षणाचे भूसंपादन महानगरपालिकेने करणे उचित होईल. विकास योजनेमध्ये उक्त आरक्षण इतर प्राधिकरणांसाठी जनहितार्थ प्रस्तावित केलेले आहे. इतर प्राधिकरणाने आरक्षणाचे भूसंपादन करण्यास नकार दिल्याने नियोजन प्राधिकरण म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेने वरील आरक्षणाचे भूसंपादन करणे योग्य होईल.

करीता उक्त आरक्षण क्रमांक ३१९ ''पर्यटक सुविधा केंद्र'' मध्ये बाधीत क्षेत्र अंदाजे १.३८ हेक्टर जागा संपादन करण्याचा प्रस्ताव भूसंपादनाच्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहराच्या (सुधारीत) मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ३१९ ''पर्यटक सुविधा केंद्र'' मध्ये बाधीत क्षेत्र अंदाजे १.३८ हेक्टर जागा संपादन करणेस व भूसंपादनासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९९/१३ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, यापूर्वी दिनांक १९/०१/२००५ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील विषय क्रमांक ५४३/२० नूसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७ (१) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या शासन मंजुर विकास योजनेत मौजे गारखेडा येथील सर्व्हे क्रमांक ५५ वरील जागेतील मंजुर सुधारीत विकास योजना प्रस्तावात बदल करून त्याठिकाणी नव्याने विभागीय क्रिडा संकुलाचे आरक्षण ठेवणे बाबत राज्य शासनाने दिलेल्या निर्देशात काही अंशी बदल सूचवुन ठराव पारित करण्यात आला.

मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावानुसार उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार शासन मंजुर विकास योजनेत फेरबदल सुचवणारी अधिसूचना महानगरपालिकेने जा.क्र./मनपा/नरवि/वि.यो./३५९३/०५ दिनांक २६.१२.२००५ नुसार जारी केली. सदरील अधिसूचनेला महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १६ मार्च २००६ रोजी प्रसिध्दी देण्यात आली तसेच स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी देण्यात आली व मिळकतीच्या व प्रस्तावाच्या हितसंबंधी कार्यालयाकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी त्यांच्याशी पत्रव्यवहाराद्वारे सूचना देण्यात आली.

उपसंचालक तथा सचिव विभागीय क्रिडा संकुल कार्यकारी समिती औरंगाबाद यांनी सदरील प्रस्तावात आक्षेप दाखल केला असता संबंधीतांना रिसर सुनावणी देवून त्यांच्या आक्षेपाची नोंद घेण्यात आली. उपसंचालक, क्रिडा विभाग औरंगाबाद यांनी नोंदविलेल्या आक्षेपाप्रमाणे राज्य शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम-३७ (१) अन्वये दिलेल्या निर्देशा सोबत पाठविलेल्या भाग नकाशा व या कार्यालयाने प्रारूप फेरबदल सुचविणारा प्रसिध्द केलेला भाग नकाशा या मध्ये फरक आहे. सदरचा फरक हा मा.सर्वसाधारण सभेने दिनांक १९.०१.२००५ रोजी विषय क्रमांक ५४३/२० नुसार पारित केलेल्या ठरावाप्रमाणे केला आहे. सदरील ठरावात शासनाच्या निर्देशा व्यतिरिक्त खालील प्रमाणे दुरूस्तीसह मान्यता दिली आहे.

०१. सभोवतालच्या भागाचे समन्वयाचे तसेच नियोजनाच्या दृष्टीकोनातून सर्व्हे नंबर ५४ मधील काबरानगर ह्या मंजुर रेखांकनास पुरेशा रूंदीचा पोच रस्ता उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून सर्व्हे क्रमांक ५५ गारखेडा अंतर्गत १५.०० मीटर रूंद पूर्व-पश्चिम विकास योजना रस्ता न वगळता तो विद्यमान मंजुर विकास योजनेनुसार कायम ठेवावा व सुतगिरणी चौक पासून ते काबरानगर रेखांकनातील १५.०० मीटर रूंद रस्त्यापर्यंत उत्तर दक्षिण नविन १५.०० मीटर रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करावा.

०२. आरक्षण क्रमांक २४८ क्रिडांगण खालील सर्व्हे क्रमांक ५५ बाहेरील क्षेत्र लगतच्या १२.०० मीटर रूंद पूर्व -पश्चिम रस्त्याच्या क्षेत्रासह आरक्षण क्रमांक २४९ प्राथमिक शाळा म्हणून आरक्षित करण्यात यावे.

तथापि या बदलापैकी बदल क्रमांक (०१) बाबत आक्षेपकानी दुरूस्ती सुचवली असून सुतगिरणी चौक ते काबरानगर (उत्तर दक्षिण रूंद नियोजित रस्ता) १५.०० मीटर रूंद ऐवजी ९.०० मीटर रूंद असावा असे सुचवले असून रस्त्याच्या लांबीच्या प्रमाणात ९.०० मीटर रूंदीचा रस्ता पुरेसा होतो. हा रस्ता राज्य

शासनाच्या निर्देशा व्यतिरिक्त आहे. तसेच नियोजनाच्या दृष्टीकोनातून या रस्त्याचे महत्व काबरानगर या वसाहतीस, सुतगिरणी चौकातून नजीकचा पोच रस्ता उपलब्ध व्हावा या कारणासाठी आहे. करीता शासनाच्या संबंधीत खात्याने घेतलेला आक्षेप विचारात घेवून रस्त्याच्या रूंदी बाबत १५.०० मीटर रूंद ऐवजी ९.०० मीटर रूंद असा बदल करावा असे प्रशासनाचे मत आहे. तसेच वरील पैकी (०२) बाबत म्हणजेच आरक्षण क्रमांक २४९ प्राथमिक शाळा या नव्याने नियोजीत करावयाच्या आरक्षणाचे क्षेत्र शासन निर्देशानुसार तंतोतंत असावे असे प्रशासनाचे मत आहे. तरी वरीलप्रमाणे बदल करण्याच्या प्रस्तावामूळे कार्यालयाने या पूर्वी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील क्षेत्रात कोणताही बदल होत नाही तसेच सदरील बदलामूळे कोणताही नविन मिळकतधारक विकास योजनेच्या प्रस्तावाने बाधित होणार नाही. या करीता पुन्हा नव्याने फेरबदलाच्या प्रारूपा बाबत अधिसूचना प्रसिध्द करण्याची आवश्यकता नाही.

सदर प्रस्तावास मान्यता होवून प्रस्तुत प्रकरणात उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाच्या प्रस्तावास अंतीम मान्यते करीता शासनास शिफारस करण्यासाठी प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

मा. महापौर　　　: मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा दिनांक १९.०१.२००५ विषय क्र.५४३/२० नुसार औरंगाबाद शहराच्या मंजुर सुधारीत विकास योजनेत मौजे गारखेडा येथील सर्वे नं.५५ च्या संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये प्रस्तावित कार्यवाही अंतर्गत आलेल्या आक्षेपांची सुनावणीनंतर प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे सुतगिरणी चौक ते काबरानगर प्रस्तावित १५ मीटर रूंद ऐवजी ९ मीटर रूंद असा बदल करणेस तसेच आरक्षण क्र.२४९ प्राथमिक शाळाचे प्रस्तावित केल्याप्रमाणे नव्याने आरक्षणाचे नियोजन करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल करण्याच्या प्रस्तावास अंतीम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

मा.महापौर　　　: पुरवणी विषय नंतर घेण्यात येतील.

या बरोबर **राष्ट्रगिताने** सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.